
REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 7 | ISSUE - 11 | AUGUST - 2018

# राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा सांस्कृतिक दहशतवाद

प्रा. डॉ. अंबादास नरहरी बिराजदार
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, तुळजापूर, जि. उस्मानाबाद (महाराष्ट्र).

## प्रस्तावना



१९८० नंतरच्या भारतीय राजकारणाचे स्वरूप पुर्णतः बदललेले जाणवते. धर्माचा राजकारणावर पडलेला प्रभाव आणि त्यामुळे राजकारणाला मिळालेले धार्मिक संघर्षाचे स्वरूप एक चितंणीय बाब आहे. स्वा. सावरकरांचा हिंदू राष्ट्रवाद आणि गोळवळकर गुरूजी प्रणित सांस्कृतिक राष्ट्रवाद यामध्ये सैध्दांतिक फरक असुन गुरूजींचा राष्ट्रवाद हा बहुजनवादी सांस्कृतिक दहशतवाद निर्माण करणारा व त्याचे पोषण करणारा असा आहे. तसे पाहता जागतिक पातळीवर इस्लामिक दहशतवाद आणि त्याला प्रतिरोध करणारा ख्रिश्चन धर्मिय दहशतवाद जागतिक अस्तित्वाला आणि सुरक्षिततेला घातक ठरणारे दहशतवाद आहेत. आजच्या दहशतवादाचे स्वरूप, त्याचा मानवतेला असलेला धोका आणि त्यामधून मानवी जीवन अस्तित्व नष्ट करण्याच्या दिशेने होत असलेली दहशतवाद्यांची वाटचाल या जगातील विचारवंतापुढे मोठी समस्या आहे. आज जग विकसीत, विकसनशिल, अविकसीत जगामध्ये विभागले गेलेले आहे. विकसीत राष्ट्राचे अर्थिक राजकारण आणि त्याव्दारे अविकसीत देशांचे होत चाललेले अर्थिक शोषण या जाणीवेतुन अविकसीत देशामधुन उदयास आलेला अराजक सदृश्य दहशतवाद विचारात घेण्यासारख्या बाबी आहेत. विकसीत देशातील सामान्य जन आर्थिकदृष्टया तुलनेने अविकसीत देशातील सामान्य जनापेक्षा अत्यंत सुखी आणि समृध्द जीवन जगत आहेत. या विषम अशा आर्थिक जीवन पध्दतीमधून सामान्य जनामध्ये निर्माण होणारा असंतोष तेथील राज्यकर्त्यासमोरील एक मोठे आव्हान आहे. हे आव्हान रोखण्यासाठी म्हणून अनेकदा राज्यकर्ते धार्मिकतेचा आणि उग्रधर्मवादाचा व मुलतत्ववादाचा आधार शोधतात आणि स्विकारतात. आज पाकिस्तान, बांग्लादेश इतर काही मुस्लीम राष्ट्रामधुन हाच प्रश्न सातत्याने भेडसावत आहे. पाकिस्तान मधला दहशतवाद हा विचारपुर्वक पोसला जात आहे. याचा दाह भारताला आणि इतर देशांना पण लागत आहे. दहशतवादाचे स्वरूप सविस्तरपणे भारतीय राजकारणाच्या सदंर्भात अभ्यासणे संयुक्तिक ठरेल. दहशतवादाने आज सर्व जग पिडले आहे. विकसीत व विकसनशील अशा सर्व देशात दहशतवादाने अनेक लोकांचे जीवन उध्दवस्त केले आहे. दहशतवादाचा सर्व जगाने धसका घेतला आहे. अनेकांना आपले प्राण गमवावे लागले आहेत. अनेकांना जखमी होवून कायमचे अपंगत्व आले आहे.

११ सप्टेंबर २००१ रोजी जुळया मनोऱ्यावर झालेल्या हल्ल्याने अमेरिकेच्या काळजालाच हात घातला. दहशतवादाच्या प्रश्नाची धग पाश्चिमात्य देशाला तीव्रतेने भासू लागली. युनोलाही या प्रश्नाची दखल घ्यावी लागली आणि त्यातुनच दहशतवादाविरुध्द जागतीक आघाडीची घोषणा करण्यात आली. सुरुवातीला याचा संबंध फक्त अफगाणिस्तानपुरता होता परंतु अफगाणिस्तान मधील तालीबांनी सत्ता उखडून टाकल्याने किंवा अल कायदा संघटनेला नेस्तनाबुत केल्याने हा प्रश्न सुटणार नाही. दहशतवाद हा फार जुना रोग आहे त्याची पाळेमुळे अनेक देशामध्ये रुजलेली आहेत. यासाठी मुळामध्ये दहशतवाद म्हणजे काय हे समजुन घेण्याची आवश्यकता आहे. या दहशतवादाने आमच्या दोन पंतप्रधानाचा बळी घेतलेला आहे. एकटया जम्मू काश्मिरमध्ये सुमारे ५० हजार पेक्षा जास्त लोक या दहशतवादाचे शिकार झालेले आहेत.

दहशतवाद हा नेहमीच लोकशाही, धर्मनिरपेक्षता, स्वातंत्र्य आणि समता या मुल्यांना पायदळी तुडवतो. दहशतवादाची सर्व समावेशक व्याख्या करणे विचारवंतापुढे आव्हानात्मक भाग बनलेला आहे. दहशतवाद कात टाकून नित्य नूतन स्वरुप धारण करीत असल्यामुळे त्याच्या व्याख्येची व्याप्ती वाढत चालली आहे.

पंतप्रधान स्व. इंदिरा गांधी यांनी १९७५ मध्ये देशावर आणीबाणी लादली. अंतर्गत सुरक्षितता व शांततेच्या नावाखाली सर्व विरोधी पक्षाच्या कार्यकर्त्यांची धरपकड केली. याचाच परिणाम म्हणून स्व. जयप्रकाशजींच्या नेतृत्वाखाली आणि मार्गदर्शनानुसार जनता पक्षाची निर्मिती झाली. भारतीय राजकारणात एका नव्या राजकीय अध्यायाची सुरवात झाली. कॉंग्रेसला पर्याय म्हणून सर्व विरोधी पक्षांचे संघटन ही एक सर्व सामान्यांना आशादायी बाब होती. परंतु केवळ अडीच वर्षाच्या कालखंडात जनता पक्षाचा व्दिसदस्यत्वाच्या पश्नावरुन प्रयोग फसला आणि जनता पक्षाचे विघटन झाले. पूर्वीच जनसंघ आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघ प्रणित विचारांची बैठक असलेला कार्यकर्त्यांचा एक वर्ग भारतीय जनता पक्ष म्हणून उदयास आला. विशेषत १९८० नंतर भारतीय राजकारणाचे स्वरुप बदलले. धर्मनिरपेक्ष राजकीय जीवन पध्दतीला धक्का हादरा देणा-या अनेक घटना घडत गेल्या. भारतीय राजकारण एका वेगळया वळणांवर येऊन पोहोचंले. धर्मनिरपेक्ष राजकारणाची विचारपंरपरा जोपासणारे आणि त्या धर्मनिरपेक्षतेला उघडउघड आव्हान देणारे असे दोन तट भारतीय राजकारणाच्या क्षितीजावर दिसू लागले.

१९७८ ते २००२ या चोवीस - पंचेवीस वर्षाच्या काळात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने सर्व कल्पकता वापरुन ज्या पध्दतीने राजकीय डावपेच आखले आणि त्याची कार्यवाही केली, त्यामुळे भारतीय जनता पक्ष राजकीय सत्तेच्या दिशेने जाणारा मार्ग सुकर झाला. भारतीय जनता पक्ष देशाच्या सत्तास्थानी आला. सत्ताप्राप्ती झाली. भाजपने अनेक पक्षासी वैचारिक आत्मविसंगत तडजोडी घडवून आणल्या. भारतीय जनता पक्षाने या काळात इतर राजकीय पक्षाशी ज्या राजकीय तडजोडी घडवून आणल्या त्यामुळे संघ भाजपवर नाराज झाला. संघ प्रणित विश्व हिंदू परिषद, स्वदेशी जागरण मंच, भारतीय मजदूर संघ, अखिल भारतीय विदयार्थी परिषद इ. सारख्या संघटनांनी भाजपवर सातत्याने टीकास्त्र सोडले. या मागे त्यांचा उददेश आपल्या विचारप्रणालीची अंमलबजावणी करण्यासाठी भाजपवर दबाव आणणे हा होता. संघ आणि संघप्रणित संघटना त्यांची राजकीय शक्ती असलेला राजकीय पक्ष भाजपवर टिका करतात तर कधी भाजप धोरणाचे आणि कृत्याचे समर्थन करतात. हे संघप्रणित डावपेचाचे, शिस्तीचे लक्षण आहे. संघ एकेकाळी स्वतःला सांस्कृतीक संघटना असल्याचा दावा करीत होता. आजही संघ वेगवेगळया पातळीवर वेगवेगळी भूमिका घेत असतो. २००२ साली संघाने काश्मिरच्या प्रश्नावर आपली स्वतंत्र भूमिका मांडून सर्वांना आर्श्चयचकीत केले. काश्मिरचे तीन भौगोलिक विभागात विभाजन करण्याची मागणी संघाने केली. आणि स्वतच्या भूमिकेच्या सर्मथनात त्याचवर्षी होऊ घातलेल्या सार्वत्रिक निवडणूकांत यांनी स्वत:चे उमेदवार उभे केले. संघ केवळ सांस्कृतिक संघटना नसून प्रथमपासून दबावगटाची भूमिका बजावत आहे हे जाणवते. हिंदूत्ववादी राजकारणाची कास धरलेल्या राजकीय पक्षावर आपला प्रभाव निर्माण करुन आपले विचार आपण पुरस्कृत केलेल्या राजकीय पक्षाव्दारा कार्यान्वित करण्याची चाल प्रथमपासून संघ बजावत आहे हे दिसते.

१९८० च्या दशकानंतरचे भारतीय राजकारणाला संघ आणि संघपरिवाराच्या इतर संस्थांच्या कार्यक्रमामुळे सतत धर्म आणि राजकारणाच्या परिघात फीरत राहिलेले आहे. म्हणून संघ, संघाचे स्वरुप आणि संघाची कार्यपध्दती मुळापासून समजून घेणे अगत्याचे ठरते. अलीकडील काळात हिंदूत्ववादी चळवळीमधील अनेकांनी संघाच्या कर्तुत्वाला सोनेरी झळाळी देण्याचा आपल्या लेखणीव्दारे प्रयत्न चालविला आहे. रमेश पतंगे, डॉ. रा.ह. तुपकरी, ज. द. जोगळेकर, स.ह. देशपांडे आदींनी संघ आणि संघाच्या कार्यपध्दतीचा व विचारपरंपरेचा आलेख चढत्या क्रमाने मांडून, संघच केवळ देशाला व येथील हिंदूंना तारु शकेल असे भासवून भारतीय समाज मनाला वेगळी दिशा देण्याचा प्रयत्न करीत आहे. गांधी विरुध्द गांधी या नाटकाला होणारी गर्दी, गांधी हत्या ऐवजी गांधी वध या शब्दांची योजना करुन केले जात असलेले नथुराम गोडसेचे उदात्तीकरण या बाबी विशिष्ठ वर्णाच्या व वर्गाच्या मानसिक विकृतीची अभिव्यक्ती आहे, हे दिसून येते. भारतीय समाज मनाचा व्यापक दृष्टिमधून विचार होत असताना भारतीय सामाजिक आणि राजकीय जीवनात संघाचे नेमके स्थान कोणते याचाही या अनुषंगाने मुलतः विचार होणे गरजेचे आहे.

## राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वरुप -

डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना इ. स. १९२५ च्या विजयादशमीला नागपुर येथे केली. संघ स्थापनेच्या वेळी संघाची नेमकी वैचारिक बैठक व उददेश स्पष्टपणे लिखित स्वरुपात मांडला गेला नव्हता. १९२५ च्या दरम्यान भारतीय स्वातंत्र्याची चळवळ गांधीजीच्या नेतृत्वाखाली सामान्यजनामध्ये रुजू लागलेली होती. टिळकांच्या मृत्यूनंतर देशाच्या स्वातंत्र्य चळवळीची सुत्रे गांधीजीकडे आलेली होती. कॅंगेस च्या स्वातंत्र्यचळवळीच्या राजकारणांशिवाय देशात इतर अनेक संघटना देशाच्या स्वातंत्र्यप्राप्तीसाठी प्रयत्नशील होत्या. त्यापैकीच संघ ही एक चळवळ असावी असा अनेकांचा समज होता. तरुणांना केवळ भावनिक आव्हानाने संघटना बांधण्यात संघ कार्यकर्ते यशस्वी झाले होते. संघामध्ये मुख्यतः जी बौध्दिके होत- त्यात भगवा ध्वज हाच राष्ट्रीय ध्वज, हिंदुस्थान हिंदुंचा आणि एक चालकानुवर्तित्व या तत्वाचीच चर्चा होत असे. प्रारंभी हिंदूंचा उज्वल इतिहास, सांस्कृतिक परंपरा, पाश्चात्य लोकशाही

संकल्पनेची चेष्टा आणि कॉंग्रेसचा अधिक्षेप या सामग्रीवरच संघाची बौध्दिक आणि संघटनात्मक उभारणी झालेली होती. असे अनुभव स. ह. देशपांडे यांनी

१. मौज दिवाळी अंक १९७४ मध्ये संघातले दिवस या लेखात मांडलेले आहेत. डॉ. हेडगेवार हे जरी राष्ट्रीय स्वयंसेवक संघटनेचे संस्थापक असले तरी त्यांनी लिखीत स्वरुपात संघ आणि संघाची वैचारिक भूमिका कोठेच मांडलेली नाही. डॉ. तुपकरी रा. ह. संघ आणि संघ संस्थापक डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांच्या संदर्भात आपल्या

२. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ या ग्रंथात पृष्ठ ३५ वर लिहितात - कोणत्याही सामाजिक संघटनेला समजून घेण्याकरिता त्या संघटनेच्या प्रभावशाली नेतृत्वाला त्यांच्या जीवनाला, त्यांनी त्यांच्या जीवनात आलेल्या आव्हानाला कशा प्रकारे प्रतिसाद दिला याचा चिकित्सात्मक अभ्यास आवश्यक आहे. संघाचे तृतीय सरसंघचालक डॉ. बाळासाहेब देवरस हे नेहमी म्हणत असत, संघ समजून घ्यावयाचा असेल तर सरसंघचालक डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांचे जीवनचरित्र अभ्यासणे, समजणे अत्यावश्यक आहे. त्याविना संघअध्ययन अपुर्ण राहिल. डॉ. हेडगेवारांना न समजता संघ समजण्याचा प्रयत्न म्हणजे पालथ्या घागरीवरील पाणीच ठरेल.

३. डॉ. तुपकरी पुढे म्हणतात आजच्या संघ परिवार संघटनेला विकसीत करण्याला दुस-या व तिस-या सरसंघचालकांनी फार मोठी आणि महत्वाची भूमिका वठविली आहे. आजचा संघ परिवार त्यांचीच देण आहे असे म्हटल्यास अतिशयोक्ती ठरणार नाही. संघ म्हणजे डॉ. हेडगेवारांची मुळची संकल्पना. ती त्यांनी १९२५ - ४० च्या संघजीवनात परिपुर्णता विकसित करुन दाखविली. १९४० - १९७३ या काळात श्री गुरुजींनी (मा. स. गोळवळकर) याचे रुपांतर संघ परिवारात केले. त्यांचे आणखीन मोलाचे योगदान म्हणजे त्यांनी संघाच्या आचारविचारांचे शब्दांकन केले. त्यामुळे संघाचे तात्विक अधिष्ठान, त्यांचे विश्वमानव समुहातील स्थान, काळानुरुप हिंदुत्वाच्या रुपाने सर्वांसमोर आले. डॉ. हेडगेवारांच्या रुपात संघाचे दृष्टेपण मुर्तरुपात असले तरीही त्या रुपाचे विशदीकरण व संकलित रुप गुरुजींच्या शब्दांत विचार नवनीत Bunch of thoughts या संघगीतेच्या रुपात आजही मान्यताप्राप्त आहे. डॉ. तुपकरी यांच्या अनुरोधाने संघाचे तिसरे सरसंघचालक श्री बाळासाहेब देवरस यांच्या संबंधी आपले विवेचन मांडतात. तिसरे सरसंघचालक श्री बाळासाहेब देवरस यांनी १९७३ ते १९९४ या कालखंडात संघपरिवाराच्या शक्तीत वाढ केली. ते राष्ट्रजीवनाच्या केंद्रस्थानी आले. संघपरिवारातील अनेक संघटना आपापल्या क्षेत्रात अग्रणी झाल्या. संघशक्तीला त्यांनी समाजसेवेकरिता उदयुक्त केले. संघातील समाजसेवा विभाग त्यांचीच देण आहे. त्यांनी संघशक्तीचा वापर समाजजीवनातील अन्यत्र अर्जीत करुन ते संघ विचारानुसार बलवान करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळेच मागील सहा वर्ष एक संघ सेवक भारताचा पंतप्रधानच नाही तर सर्वोच्च मान्यतेचा झाला. There is no alternative. त्यामुळे संघाचा अभ्यास या तिघांच्या कार्याव्दारे सुव्यवस्थित होऊ शकतो.

४. संघाचे आपले स्वतःचे साहित्य फार नाही. संघाची स्थापना जेंव्हा झाली तेंव्हा संघाची वैचारिक बैठक स्पष्ट करणाची घटना नव्हती. केवळ तरुणांना संस्कारीत करणारी एक सांस्कृतिक चळवळ, संघटना म्हणूनच तिचा उल्लेख केला गेला. संघाचे साहित्य म्हणून ज्या साहित्याचा विचार व्हावा यामध्ये डॉ. हेडगेवारांचे बृहतचरित्र, काही भाषणे, त्यांच्या काळातील वृत्तपत्रीय बातम्या एवढे साहित्य उपलब्ध आहे. श्री गुरुजींचे विचार नवनीत Bunch of thoughts हे आजही संघगीता म्हणूनच ओळखली जाते. गुरुजींनी आपल्या विचार नवनीत मध्ये संघाची वैचारिक बैठक स्पष्ट केलेली आहे.

संघाच्या वैचारिक परंपरेचा आणि तिच्या विकासक्रमाचा आढावा घेत असताना डॉ. रा. ह. तुपकरी म्हणतात - संघाच्या सरसंघचालकाव्यतिरिक्त संघाचे अनेक जेष्ठ कार्यकर्ते जीवनाच्या अन्य क्षेत्रात राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय ख्याती प्राप्त आहेत. त्यांचे लेख, पुस्तके , त्यांच्या भाषण चर्चेचे वृत्तपत्रीय विवरण आणि विशेष म्हणजे त्यांच्या आपल्या क्षेत्रातील विषयासंबंधातील मौलीक चिंतन संघपरिवार समजण्यास फार उपयुक्त राहिल. उदा. आर्थिक चिंतन करता पं. दिनदयाळ उपाध्याय, दत्तोपंत ठेंगडी, माधव जोशी इ. धार्मिक चिंतनाकरिता विश्वहिंदूपरिषदेशी संबंधीत अनेक साधू-संत मंडळी, अशोक सिंघल, प्रवीण तोगडीया इ., समाजसेवा स्वास्थ्य अशा विषयाकरिता नानाजी देशमुख, राजकारणाकरिता वाजपेयी व अडवाणी इ. या सर्व विचारांचे मुळ गुरुजींच्या मुळ संघ विचारात आहे. त्यामुळे मुळातच हिंदु संघटनेचे कालोचित आकलन आणि आचार विचार समजण्यास श्री गुरुजींचे मुळ विचार त्यांच्या मृत्युला ३० वर्षे होऊन गेल्यावरही संघाचे मान्यताप्राप्त विचार आहेत.

संघाच्या ८०-८५ वर्षाच्या वाटचालीत संघाच्या अखिल भारतीय स्तरावर चिंतन बैठका झालेल्या आहेत. या चिंतन बैठकीत संघाची आगामी काळातील कार्याची दिशा कोणती असावी हे संघातील अग्रगण्य कार्यकर्ते ठरवित असत व असतात. सामान्यपणे १९५४ साली लिरंगी येथे, १९६० साली इंदुर, १९७२ साली ठाणे, १९८१, १९८६, १९८९, १९९८ साली नागपुर अशा क्रमाने रा. स्व. सेवक संघटनांच्या आखिल भारतीय स्तरावरच्या बैठका झाल्या. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला ख-या अर्थाने समजुन घेणे बाबत जी मानसिकता हवी त्या संदर्भात डॉ. तुपकरी वै. ह.रा. स्व. संघ / पृष्ठ ३८ वर म्हणतात

- राष्ट्रीय स्वयंसेवक नावाच्या संघटनेचा आचार विचार हा एकटया दुकटया स्वयंसेवक - कार्यकर्त्यांच्या व्यवहारावरुन नाही किंवा एखादया घटनेवरुन नाही, किंवा एखादया विषयाच्या सीमीततेवरुन नाही - तर व्यापक संघ परिवार - आचार विचारावरुन तपासणे, अभ्यासणे ख-या दृष्टिने वैज्ञानिक राहिल. संघाची १९२५ पासून आजपर्यन्तची जडणघडण, त्यात होत गेलेले बदल, त्यांचा निस्पृह व्यवहार, त्यांचा संघपरिवार म्हणून विकसित झालेली व्याप्ती, त्यादवारे सामाजिक विशेषत गरीब, मागास किंवा वनात राहीलेल्यांचे जीवनात परिवर्तन करण्याकरिता चाललेले प्रयत्न, किंवा अनेक विषयातील त्यांचे मुलभुत एकात्म चिंतन, इ. सर्वांचा साकल्याने विचार करुन व सत्यातील वृत्तीतून अभ्यास आहे. त्याव्दारेच संघाचे खरे स्वरुप लक्षात येईल. संघाला केवळ राजकारणाच्या चष्म्यातून पाहणे म्हणजे व्दितीय लाटेतील Tunnel vision घेऊन पाहणे होईल. त्यातून पूर्ण सत्य बाहेर येणार नाही. संघाचा अभ्यास हा Multidimensional तृतीय लाटेच्या मानसिकतेतून करणे अनिवार्य आहे. ज्याला विकसित दृष्टी आहे तोच हे करु शकेल.

संघाला एकूण कार्यात्मक व एकात्म व्यापकतेसंबंधी पुढे ते म्हणतात-हिंदुत्वाच्या विचाराचा गाभा, संघाव्दारे त्याचे प्रस्फुटीकरण, हिंदुत्वाचा इतिहास, त्यात असंख्यानी दिलेले योगदान आणि त्यांचे विश्लेषन, त्यातुन निघणारे निष्कर्ष इ. ची संघ अचार - विचाराची बसते काय? याचाही अभ्यास करणे संघ समजण्याकरीता आवश्यक आहे?

संघ समजुन घेण्यासाठी अभ्यासकाने पुर्वग्रह दुषीत न होता अत्यंत तटस्थपणे संघ विचाराचा व कार्याचा अभ्यास करावा. सर्वच संघ कार्यकर्ते आग्रह धरतात. संघ ही केवळ सांस्कृतिक संघटना नसून मानवी जीवनाला बौध्दिक व्याप्ती देवु पाहणारी व इतराना ती दृष्टी बहाल करू पाहणारी संघटना आहे असे आग्रहाचे प्रतिपादन संघ कार्यकर्ते करतात. संघाच्या विचारात निसर्ग तादात्म्य, वैश्विक बंधुत्व, मानव एकता, सृष्टीची निरंतरता व स्वाभाविक विकास इं. ची पोषण होईल की विरोध? संघाच्या प्रतिपादनात परंपरागत पितृसत्ताक पध्दतीमुळे दडपला गेलेला जवळपास ५०% मानवाच्या हिताला असलेल्या महिला शक्तीचा नैसर्गिक विकास होणयाची शक्यता बळावते कि नाही? संघाच्या एकुण विषय प्रतिपादनात तर्क, विवेक, बुध्दीप्रामण्यता, प्रयोगाव्दारे सामाजिक सत्यशोधन, सत्याला सामोरे जाण्याचे धाडस, कोणत्याही प्रश्नावर सामूहिक व प्रदिर्घ चिंतन, अनुशासन प्रियता, उदारता, सहिष्णुता, विजिगोष वृत्ती, राक्षसी प्रवृत्ती विरूध्द उभे राहून मुकाबला करण्याचे धाडस यावी अन्यथा सज्जन शक्तीचा आधार इत्यादि जाणवते का? असे विविध प्रश्न उभे करून या प्रश्नांच्या उत्तरांच्या संदर्भात संघ, संघाचे विचार व संघ कार्याचा मुल्यमापनात्मक विचार केला जावा असा विचार संघ कार्यकर्ते करतात.

संघ व संघ कार्यकर्ते बदलत्या जागतिक अर्थव्यवस्थेचा पण विचार करतात हे दाखविण्याचा प्रयत्न करतात. त्या दृष्टीने त्यांचे प्रतिपादन लक्षात घेणे योग्य ठरेल. आता मुक्ततेचे, वैश्वीकरणाचे जे वारे जागतिक अर्थव्यवस्थेच्या रूपात वाहणे सुरू झालेले आहे त्याचा परिणाम संघ कार्यावर जाणवु लागला आहे. या संबंधात संघाच्या चौथ्या व सध्या असलेल्या पाचव्या सरसंघचालकाच्या विचारांत पाहावयास मिळतो. त्याव्दारेही संघाचे देशाच्या भवितव्याबददलचे आकलन समजण्यास उपयोग होईल. सध्या सन २०२० पर्यंत भारताला दुनियेतील आर्थिक महासत्ता म्हणून विकसीत करण्याचे स्वप्न घेवुन संघप्रेरीत केद्रंसरकार - चालविणारा भा. ज. प. ला पक्ष उभा आहे. (२००४) संघाची या स्वप्नाला पुर्ण मान्यता आहे. तेव्हा या संबंधात ही संघाचे आकलन करणे आवश्यक आहे.

संघ समजून घेण्यासाठी म्हणून - वरील सर्व प्रतिपादन विचारांत घेणे आवश्यक आहे असा विचार डॉ. तुपकरी यांनी आपल्या वैज्ञानिक दृष्टीकोनातून राष्ट्रीय स्वयंसेवक संघ या ग्रंथात - प्रकाशन २००५ - केला आहे. डॉ. रा. ह. तुपकरी व्यवसायाने धातूशास्त्राचे अभियंता असून, काशी विश्वविदयालयातून त्यांनी १९५९ ला B.Sc, (Met.Engg.) आणि नंतर मेलबोर्न विदयापीठातुन १९६३ साली Nature of Engineering Science या पदव्या मिळविलेल्या आहेत. जे दिर्घकाळापर्यंत काशी हिन्दू विश्वविदयालयात व नंतर नागपूरला प्रादेशिक अभियांत्रिकी महाविदयालयात प्राध्यापक होते. एकेकाळी ते नागपूरच्या रा. स्व. संघाचे बौध्दिक प्रमुख होते.

डॉ. तुपकरी संदर्भात विस्ताराने माहिती मांडण्याचे कारण म्हणजे, संघ, आणी संघ कार्याचे स्वरूप मांडण्याबाबत एक संघ शाखेचा, सुविदय बौध्दिक प्रमुखाने व्यक्त केलेले विचार ग्राहय धरावयास हरकत नसावी. या अनुषंगाने संघ व संघाचे वस्तुनिष्ठ मुल्यमापन होणे गरजेचे आहे.

### राष्ट्रीय स्वयसेवक संघाच्या स्थापनेच्या मागचा हेतू व इतिहास : -

रा. स्व. सेवक संघाची स्थापना १९२५ च्या विजयादशमीची. १९२५ पुर्वीचे भारतीय राजकारण कोणत्या व कशा अंगाने विकसीत होत गेले. १९२५ पुर्वीचे स्वातंञ्य चळवळीमधील नेमक्या कोणत्या विचारधारा होत्या. १. मुस्लीम लिग आणि कॉंग्रेसचे राजकारण आणि क्रातीकारकांची वाटचाल. हया मुख्य प्रवाहाच्या अनुषगांने १९२५ च्या पुर्वीच्या भारतीय

राजकारणाचे स्वरूप लक्षात येते. १९२५ पर्यंतच्या भारतीय राजकारणाच्या पार्श्वभूमीवर रा. स्व. संघाच्या उदयाची कारणे आपणांस शोधता येवू शकतात.

न्या. रानडे यांच्या पासुन व या विचारांसी समकालीन उदयास आलेला म. फुले यांचा क्रांतीकारी मार्ग आणि त्यामधुन विकसीत होत गेलेले बहूजनवादी राजकारण हे सुध्दा हिदूंत्ववादी संघटनाच्या उदयास कारणीभूत ठरलेले आहे. या काळात उदयास आलेल्या व वाढलेल्या ब्राम्हणेत्तर चळवळी आणि त्यामधुन फोफावलेला ब्राम्हणव्देष आणि दूसरीकडून समतेच्या तत्वावर उभा राहणारा लोकशाही समाजवादी विचार या मुळे हिंदूत्ववादी सत्रंस्त होणे स्वाभाविक होते.

१९२० नंतर कॉंग्रेसमध्ये जवाहरलाल नेहरूचा प्रभाव वाढल्यानंतर आणि त्यांनी समाजवादी धोरणाचा आग्रह धरल्यानंतर भारतातील तत्कालीन सधन वर्ग अस्वस्थ  झालेला होता. देशातला सधन वर्ग कॉंग्रेस एक राष्ट्रीय चळवळ म्हणून तीच्याशी संबंधीत होता, परंतू कॉंग्रेसने अंगिकारलेले समाजवादी धोरण मात्र या वर्गाला मान्य नव्हते. म्हणून कॉंग्रेसमधील समाजवादयांना विरोध करणारा पण कॉंग्रेसला पर्यायी संघटना निर्माण करण्याच्या खटपटीत होता. कॉंग्रेसच्या उदारमतवादी धोरणामुळे जसे हिंदुत्ववादी सत्रस्त झालेले होते, तसेच या देशातला सधन वर्ग कॉंग्रेसमधील समाजवादी विचाराने प्रेरीत झालेल्या चळवळीमुळे त्रस्त झालेले होते. कार्यकर्त्याचे वर्गीय हित संबंध धोक्यात येण्याची शक्यता निर्माण झालेली होती. याचाच परिणाम म्हणून हिंदुत्ववादी आणि सधन वर्ग यांच्या एकजुटीमुळे रा. स्व. संघ निर्मितीला अनुकुल परिस्थिती निर्माण झाली. गांधीच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्याची चळवळ संघटितरित्या चालुनही १९२५ साली संघ स्थापनेची आवश्यकता हिंदुत्ववादयांना का भासावी? या प्रश्नाचे उत्तर संघाने वेळोवेळी घेतलेल्या भूमिका समोर ठेवून शोधावे लागेल. ब्रिटीश काळांत भारतात वर्गीय शोषण होते. ब्रिटीश कालखंडात सर्व सत्ताकेंद्रात ब्राम्हणांची संख्या मोठी होती. किंबहुना इतर जातीच्या तुलनेने इंग्रजी शिक्षण घेतलेली ब्राम्हणांची संख्या मोठी असल्याने ब्रिटीश प्रशासनात व इतर क्षेत्रांत ब्राम्हणांना मोठया प्रमाणांत नोक-या उपलब्ध झालेल्या होत्या. सर्व सत्ताकेंद्रापैकी ब्राम्हण वर्गाच्या हाती इतरांच्या तुलनेने जास्त सत्ताकेंद्रे होती.

संघाचे स्वरूप समजावून घेण्यासाठी डॉ. हेडगेवार आणि इतर सरसंघचालकानी जी विचारसरणी मांडली, तीचे स्वरूप समजुन घेणे अपरिहार्य ठरते. संघाचे नेतृत्व ज्यांनी केले त्यांचे जीवन, त्यांच्या जीवनातील आव्हानाला त्यांनी कशा प्रकारे प्रतिसाद दिला हे समजून घ्यावे लागते. त्या दृष्टीने वास्तवतः आपण संघ व संघ नेतृत्वाची चिकीत्सा करणे आवश्यक आहे.

१९२५ साली रा. स्व. संघाची स्थापना झाल्यापासून स्वतःच्या उदिष्टाबाबत एक विशिष्ठ प्रकारची मोहक भाषा त्याने सातत्याने वापरली आहे. सांस्कृतिक राष्ट्रवाद आणि अध्यात्मिक उदारता स्विकारून राष्ट्रभक्ती हे सर्वोच्च मुल्य मानले तरच राष्ट्राची प्रगती होईल. संघाचे राष्ट्रचिंतन इतरापेक्षा वेगळे असून राष्ट्रजीवनाची नवी मांडणी संघाला करावयाची आहे. भारताला माता माननारा हिंदू समाज राष्ट्रजीवनाचा, राष्ट्रनिर्माणाचा प्रमुख आधार आहे. अशा भाषेत संघाचे ध्येय मांडले जात आहे. माणसे जोडण्याचे साधन प्रेम आहे. असे हेडगेवार सांगत असत. पंरतु या ध्येयाप्रत जाणारा कृतीशील मार्ग कोणता आणि या साठी संघटनेचा उपयोग कसा करावयाचा हे खुद् हेडगेवारानी कधीच कोणाला सांगितले नाही. त्यामुळे संघ हे केवळ हिंदूचे संघटन आहे एवढेच स्वयंसेवकाना माहीत होते. हिंदू संघटन आणि हिंदू संघटनाच्या माध्यमाव्दारा हिंदू राष्ट्राची निर्मीती हे ध्येय संघाने बाळगले. मुस्लीम लीगच्या राजकारणाचा एक पटटा म्हणजे जात्यंध मुसलमानामध्ये धार्मिक उन्माद निर्माण करून जातीय दंगली घडविणे. ज्या ज्या वेळी हिंदू - मुस्लीम जातीय दंगे होत तेव्हा मुसलमानाच्या विरोधात हिंदूनी संघटीत होण्यास संघाची मदत झाली. नागपुरात १९२७ साली ज्या क्रमाने जातीय दंगली झाल्या त्या क्रमाने संघ स्वयंसेवकाची संख्या वाढत गेली. डॉ. हेडगेवाराच्या १९४० च्या निधनानंतर मा. स. गोळवळकर हे संघाचे व्दितीय सरसंघचालक म्हणून निवडले गेले. ख-या अर्थाने संघाची वाढ गुरुजीच्या काळातच झाली. संघाला जी वैचारिक बैठक मिळाली ती गुरूजीच्या Bench of Thoughts, विचार नवनीत किंवा संघ गीता मधुन. गुरूजीनी वेळोवेळी जी भाषणे दिली आणि जे विचार मांडले तेच संघाची वैचारिक बैठक म्हणून मान्यता प्राप्त आहेत. गोळवळकरांना नेमकेपणे - सामाजिक रचनेसंबंधी, किंवा समाज व्यवस्थेसंबंधी, राजकीय संस्थासंबंधी, भारतीयांच्या आधूनिक जीवनात ज्या अनेक विचार परंपराचा प्रभाव निर्माण झाला, त्या संबंधी काय अभिप्रेत आहे, हे संघ व संघाचे स्वरूप समजून घेण्याच्या दृष्टीने उपयुक्त ठरेल. या संदर्भात कुंरूंदकरानी आपल्या शिवरात्र या ग्रंथामध्ये वरील संदर्भात सविस्तर विवेचन केलेले आहे.

स्वातंत्र्यानतरसुध्दा ही सत्ताकेंद्रे आपल्याच जातीच्या हाती कशी ठेवायची हा प्रश्न या जातीना सतत सतावत होता. स्वातंत्र्योत्तर भारताची राजकीय व सामाजीक सत्ता आपल्याच हाती राहिली पाहिजे, अशी महत्वाकांक्षा या जातीच्या मनात असणे स्वाभाविक होते. याचसाठी भारतातील जुने सरंजामशहा, भांडवलदार यांना संघवाल्यानी हाताशी धरले. त्यात ते यशस्वी पण ठरले. परंतु गांधीजीची सर्वव्यापी चळवळ हा त्यांच्या मार्गातला सर्वात मोठा अडथळा होता. वास्तविक पाहता स्वातंत्र्याची गांधीप्रणीत चळवळ त्यांना अडचणीची वाटत होती. कारण इ. स. १९२० पर्यंत ब्रिटीशांनी १९०९ आणि

१९१९ च्या कायदयानुसार ज्या राजकीय सुधारणाची तरतुद केली त्यामुळे स्वातंत्र्योत्तर भारतात संसदीय लोकशाही अस्तित्वात येणार हे स्पष्ट झालेले होते. संसदीय लोकशाहीत निवडणुकांच्या माध्यमाव्दारे सत्ता प्राप्ती करावी लागणार हे हिंदूत्ववादयाना नको होते. गांधीजींच्या चळवळींचा परिणाम म्हणून बहूजन समाजामध्येही राजकीय जाणीवा निर्माण होत चाललेल्या होत होत्या. गांधीजींनी स्वातंत्र्याच्या चळवळीत विशेषतः मुस्लीम आणि अस्पृश्यांना पण सहभागी करून घेतले. अस्पृश्यांच्या प्रश्नामध्ये गांधीजींनी लक्ष घालून स्वातंत्र्य चळवळ अधिक व्यापक केली. गांधीजींच्या उदारमतवादी धोरणामुळे लोकशाहीचा विचार जनमानसांत रूजेल यांची संपुर्ण खात्री झाल्यानेच गांधीजींचा अडसर कसा दूर करता येईल, ही हिंदुत्ववादयाना चितांतूर करणारी बाब होती.

कॅंगेस प्रणित चळवळ आणी ब्रिटीशांसी तडजोडी करण्याचे कॉंग्रेसचे धोरण आणि अंहिंसा व सत्याग्रहाचे पुरस्कार करणारे गांधीजीचे नेतृत्व नेभळटपणाचे व जनतेची दिशाभूल करणारे नेतृत्व आहे, असा वादळी प्रचार या हिंदुत्ववादयानी करण्यासाठी जहालवादी तरूणांचा गट राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या रूपाने उभा केला. गांधीजी हिंदूचे शत्रु असून - मुस्लीम अनुनय करणे हे कॉंग्रेसचे धोरण आहे. असा प्रचार सामान्यामध्ये करून गांधीजीच्या विषयी गैरसमज निर्माण करण्याचा प्रयत्न या हिंदूत्ववादयांनी केला. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ केवळ मुस्लीम विरोधावर जन्मला व पोसला असे नसुन गांधीजीच्या भारतीय राजकारणांत मुस्लीमांचा असलेला अनुनय जनतेपुढे ठेवून हिंदूच्या मनात जातीय व्देष निर्माण केला. त्यांचा उद्देश केवळ मुस्लीम विरोध नव्हता तर फॅसिस्ट पध्दतीने व प्रवृत्तीने भारताची राजकीय सत्ता हस्तगत करणे हा होता. परंतु गांधीजीच्या नेतृत्वाखालील कॉंग्रेसने जनमताच्या दडपनाने संघाच्या हा जहालमतवाद फोफावू दिला नाही, आणि त्यांच्या हातात राजकीय सत्ता जाण्याच्या शक्यताही संपविल्या. संघीय प्रवृत्तीने गांधीजीची हत्या करून त्यांच्या मार्गातील अडसर दूर केलेला असला तरी गांधीनी भारतीय समाजात पेरलेल्या स्वातंत्र्य, समतेच्या, लोकशाही विचार ते नष्ट करू शकले नाहीत. स्वातत्र्यांसाठी रक्ताची भाषा बोलणा-यांना अखेर गांधीजीचे रक्त सांडता आले. ब्रिटीशांचे रक्त सांडण्याची त्यांना आवश्यकता वाटली नाही.

सुरूवातीपासून संघ राजकारणापासून अलिप्त आहे. संघाला राजकीय पक्षाची भूमिका स्विकारून सत्ता मिळवायची नाही काय? वस्तुस्थिती अशी आहे की, निवडणूकाच्या माध्यमाव्दारे संघाला जनाधार प्राप्त करणे शक्य नाही. म्हणूनच संघ नेहमी दबावगटाची भूमिका पार पाडतो आहे. प्रत्येक प्रभावशाली दबावगट शासकीय धोरणावर प्रभाव निर्माण करून आपल्या इच्छेप्रमाणे शासकीय धोरणे आकारत असतो. संघाने हेच केलेले आहे. संघ ही केवळ सुशिक्षीत मोजक्या ब्राम्हण तरूणांची संघटना आहे. तीने आतापर्यंत सर्वसामान्यांच्या जीवनासाठी आवश्यक ठरणा-या कोणत्याही राजकीय प्रक्रियेमध्ये सहभाग नोंदविलेला नाही.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मुळ भूमिकेत बदल होणे असंभव आहे. संघाच्या मुळ भूमिकेत जर बदल घडविला तर संघाच्या स्वतंत्र अस्तित्वाचे प्रयोजन उरणार नाही. बाळासाहेब देवरसांच्या अलीकडील सर्व मुलाखती काळजीपुर्वक वाचल्या तर असे दिसते की त्यांनी अदयाप संघाच्या मूळ भूमिकेत कोणतेही बदल केलेले नाहीत. उलट संघाच्या जुन्याच भूमिकेबद्दल जे इतरांचे गैरसमज होते, ते दूर झालेले नाहीत. असे त्यांचे म्हणणे आहे. संघ सहजा सहजी बदलणार नाही. संघ मुस्लीमांना प्रवेश देणार नाही, किंवा त्याला हिंदूत्व स्विकारण्याची अट घालील, संघ मुस्लीमानांना तर सोडाच, परंतु बहूजन समाजात तळागाळापर्यंत पोहचण्याची शक्यता कमीच, कारण संघाचा खुप मोठा विस्तार करणे त्यांना अडचणीचे आहे.

संघाचे उदिष्ट आणि स्वरूप वस्तुतः आत्यंतिक सिमीत असून विशीष्ठ जातीचे हितसंबंध सुरक्षीत कसे राहील हाच विचार प्रामुख्याने संघनिर्मीतीबाबत आहे. हिंदू राष्ट्रवाद व हिंदूत्ववादी राजकारणाचे विवेचन त्यांनी आपल्या शिवरात्र या ग्रंथात केले आहे.

ते लिहितात, गोळवळकरांचा उगम एकाएकी पावसाळी छत्रीप्रमाणे झालेला नाही. पंचेवीसहून अधिक वर्षे त्यांचे कार्य समाजात चालू आहे. फार जुन्या काळी स्वातंत्र्यपुर्व काळात त्यांचे We हे पुस्तक प्रकाशीत झालेले होते. अलिकडे स्वातंत्र्योत्तर काळांत त्यांचे Bunch of Thoughts, विचार नवनीत हे पुस्तकही प्रकाशीत झालेले आहे. हे या दोन्हीही पुस्तकाकडे पाहत असताना गोळवळकर गुरूजी पुरोगामी किंवा बुध्दीवादी आहेत असे कधीच कुणाला वाटण्याचे कारण नाही. इतिहासकारांनी सांगीतलेला इतिहास गुरूजीनी कधी मान्य केला नाही. गोळवळकर गुरूजी संबंधी असे स्पष्ट मत कुरूंदकरानी आपल्या शिवरात्र या ग्रंथात व्यक्त केलेले आहे.

कुरूंदकरानी संघाचे स्वरूप स्पष्ट करताना लिहीले आहे की - गोळवळकर गुरूजी म्हणजे कुणी परंपरागत शिक्षण घेतलेला मठाधीश, पीठाधीश नव्हे. गोळवळकरांचे सामर्थ्य ज्या विचारसरणीसाठी ते उभे आहेत त्या विचारसरणीसाठी त्याची जोपासना केलेल्या संघटनेत आहे. ही संघटना परंपरांगत धर्म मानना-यांची संघटना नव्हे. राष्ट्रीय स्वयं सेवक संघात कर्मठ, परंपरावादी माणसाचे पटणार ही नाही. संघ सार्वजनिक कार्यक्रम म्हणून याचा जत्रा भदकीत

नाही. किंवा यज्ञ याग ही करीत नाही. संघातील तरूणांना हिमालयात जावून तप करण्याची किंवा योग साधना करण्याची प्रेरणा दिली गेली नाही. शेंडी, जानवे, संध्या, एकादशी, वैश्वदेव, श्राध्दपक्ष याबाबतीत फार मोठा आग्रह धरणारी संघ ही संघटना नव्हे. आधुनिक सुशिक्षीतांची ही संघटना असून हे सर्व तरूण हिंदू राष्ट्राच्या संरक्षणाच्या प्रतिज्ञेचे गोळवळकराच्या भोवती जमलेले आहेत. शकंराचार्य, स्वामी करपात्रजी यांच्या पेक्षा गोळवळकरांचे नेतृत्व वेगळे आहे. हे आपण नीट समजून घेतले पाहिजे.

हिंदूत्ववादी संघटनाच्या पुरोगाम्याचा नेमका विरोध कुठे आहे हे कुरूंदकरानी स्पष्ट केले आहे. गोळवळकरांनी चार्तुवर्ण्याचा उघड पुरस्कार केला. गुरूजींना अभिप्रेत असलेला चार्तुवर्ण्य आणी गुरूजीच्या विचार परंपरेनुसार संघाने स्विकारलेली परंपरा चार्तुवर्ण्य व्यवस्थेच्या संरक्षणाची आहे. महाभारताच्या शांतीपर्वकाळापासून ते कौटिलयाच्या अर्थशास्त्रापर्यंत प्राचीन भारतात जे काही राजकीय तत्वज्ञान सांगितले गेले, त्याचा प्रमुख उद्देश्य चार्तुवर्ण्याची रक्षण करणे हाच होता. राजाचे प्रमुख कर्तव्य होते, आणि जो राजा ते कर्तव्य पार पाडण्या असमर्थ ठरत आहे त्याला पदच्यूत करण्यात येत असे. या परंपरेने राजा आणि चार्तुवर्ण्य यांचे जे अतुट नाते निर्माण केले त्याचाच परिणाम म्हणजे राजा कुठला आणि कोण असावा याबददल ही परंपरा फारसा गंभीरपणे विचार करीत नाही. राजा कोणताही असला तरी त्याने चार्तुवर्ण्यांचे रक्षण केले पाहिजे. वस्तुत संपुर्ण भारतीय जीवनाला व्यापणारी आणि सामाजिक जीवन जाती - उपजाती - वर्ण व्यवस्थेत विभागणारी ही चार्तुवर्ण्य या भारतीय माणसाच्या गुलामीची, सामाजिक विषमतेची परंपरा आहे. भारतीय समाजाच्या मागासलेपणाच्या संदर्भात रावसाहेब कसबे म्हणतात. प्राचीन काळापासून ते ब्रिटीश भारतात येईपर्यन्त भारतीय समाज व्यवस्थेत उच्च स्थानी असलेल्या ब्रांम्हणांची सारी विदवत्ता फक्त चार्तुवर्ण्य व्यवस्थेचे समर्थन करण्यात झाली. आणि क्षत्रियांची सारी शक्ति त्या व्यवस्थेच्या अंमलबजावणीत झालेली दिसते. भारताच्या मागासलेपणाचे हेच प्रमुख कारण असावे.

संघाला अभिप्रत असलेल्या चार्तुवर्ण्य गोळवळकर गुरुजींनी प्रमाणित मानलेल्या गुणकर्म सिंध्दाताशी संबंधित आहेत. गुरुजींनी गुणकर्मविचारांची परंपरा कधीही लपवून ठेवली नाही. त्यांनी त्या परंपरेचा अभिमान बाळगळा आणि तिचा प्रचार व प्रसार केला. गोळवळकर गुरुजींना साठीच्या दशकाच्या शेवटी असा प्रश्न विचारण्यात आला की, चार्तुवर्ण्य ही रुढी आहे की धर्म? त्यावर गुरुजी उत्तरले ती रुढी नसून धर्मच आहे. श्रुती - स्मृती इश्वर निर्मित आहेत. पुढे गुरुजींना विचारण्यात आले चार्तुवर्ण्य गुणकर्मश की जन्माधिष्ठित? या प्रश्नाचे उत्तर गुरुजींना प्राचीन परंपरेला अनुसरुनच स्पष्ट शब्दात दिले होते, त्यांनी सांगितले चार्तुवर्ण्य गुणकर्मश होते हे खरे, पण गुण म्हणजे पात्रता आणि कर्म म्हणजे आवडीनुसार स्विकारलेले कार्य हा अर्थ चुकिचा आहे. गुण म्हणजे सत्व, रज, आणि तम हे होत. आणि कर्म म्हणजे पुर्वजन्मात केलेले कार्य होय, पूर्वजन्मीच्या कर्मानुसार पुढील जन्मी वर्ण मिळतो.

गुरुजींच्या चार्तुवर्ण्य व्यवस्थेसंबंधी आणि त्यांनी मांडलेल्या पूर्वजन्म कर्म सिंध्दाताविषयी कुरुंदकरांनी आपल्या शिवरात्र या ग्रंथात खालील भाष्य केलेले आहे. गुरुजींचे चार्तुवर्ण्य व्यवस्थेसंबंधीची भूमिका किती हास्यास्पद आहे हे दाखवून देतात. ते लिहितात, श्रीमंती हे गतजन्मीचे पुण्य, म्हणून श्रीमंत पुण्यवान आहेत. या अमानूष जंगली सिंध्दाताचे सोज्वळ रुप पूर्वजन्माचा सिंध्दात असतो हा सिंध्दातही गुरुजींना मान्य आहे. त्यातून एक गंमत पाहण्याजोगी आहे, गतजन्मीच्या सिंध्दातांनुसार गुणकर्माप्रमाणे या जन्मी माणुस शुद्र होतो येथवर ठीक आहे. पण या जन्मी माणूस ख्रिश्चन, मुसलमान हा कोणत्या गुणकर्माने होतो? हिंदू पुण्यवानांना हिंदु - ब्राम्हण करणारा परमेश्वर मुस्लिम पुण्यवानाचे काय करतो? हिंदु पाप्याला परमेश्वर हिंदु शुद्र करतो की त्यांना मुस्लिम उलेमा करतो कि महम्मद गझनीचा जन्म घेऊन मुर्ती फोडण्याचा हक्क देतो हे कळल्याशिवाय वर्णव्यवस्थेसंबंधीची गुरुजींची भूमिका पुष्कळ संदिग्ध राहते असे म्हटले पाहिजे.

गुरुजींच्या लिखानामधून आणि त्यांच्या बोलण्यातून त्यांचे चार्तुवर्ण्य व्यवस्थेवर आणि चार्तुवर्ण्य इश्वरनिर्मित असण्यावरील श्रध्दा किती अविचल आणि अव्यभिचारी होती हे स्पष्ट होते. भारतात चार्तुवर्ण्य व्यवस्था अबादित ठेवणे हे गुरुजींचे स्वप्न होते तसेच ते राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचेही स्वप्न आहे. तसेच उदिष्ठ आहे. स्वातंत्र्योत्तर भारताची राजकीय सत्ता अशाच राजकीय नेतृत्वाकडे असावी की जे प्राचिन आणि मध्ययुगीन राजाप्रमाणे या व्यवस्थेचे संरक्षण करतील म्हणूनच त्यांच्या साठी धर्मभावनेच्या आधाराने जनाधार उभा करणे हा संघाचा एकमेव कार्यक्रम बनलेला आहे.

## हिंदु जमातवाद :-

हिंदू धर्म आणि वैदिक संस्कृती ही जगातील एक श्रेष्ठ संस्कृती आहे हिंदु जीवन पध्दतीमध्ये जाती - उपजाती, वर्णव्यवस्था जन्माधिष्टीत तत्वानुसार निर्माण होण्याची प्रक्रिया सुरु होण्यापर्वी वैदिक धर्माचे आणि संस्कृतीचे जे व्यापक रुप होते ते कालांतराने बदलत गेले. समाज विकासाच्या प्रकियेत समाज जीवनांर्तगत जे अंर्तविरोध निर्माण होत गेले, त्यामुळे काही काळ गतिमान जीवन कुंठीत झाले. जगातील इतर धर्मातील आणि संस्कृतीमध्ये जे अनेक दोष निर्माण झालेले आढळतात तसेच वैदिक संस्कृतीमध्ये पण अनेक दोष निर्माण होत गेले. जीवनाच्या विविध अंगांना स्पर्श करण्याची आणि

त्यांचा विकास करण्याची दृष्टि व नवीन विचार आत्मसात करण्याची वृत्ती या वैदिक जीवन पध्दतीमध्ये होती. उपनिषदांच्या रुपाने जगाला तत्वज्ञानाची देणगी देणारी, रामायण महाभारतासारखे महाकाव्य पुरवणारी, जैन व बौध्द तत्वज्ञानाची मांडणी व विकास घडविणारी व त्यांचे योगदान देणारी, नृत्य, नाटय, शिल्प, संगीत यासारख्या कलांचा विकास घडवणारी ही वैदिक संस्कृती काळाच्या प्रवाहात अधिक विकसीत होऊन तिला भारतीय संस्कृतीचे सर्वसमावेशक रुप मिळाले. हीच संस्कृती जगाच्या आदराचा व कौतुकाचा विषय ठरली. कालांतराने या वैदिक संस्कृतीचे रुपांतर हिंदु संस्कृतीमध्ये झाले. जन्माधिष्टित तत्वाचा अवलंब संस्कृती विकासाच्या प्रकियेत स्विकारल्यानंतर जो आत्मपुजेचा व आत्मसन्मानाचा मानसिक रोग जडतो तो हिंदु जीवन पध्दतीत फोफावला व स्थिरावला. हा आत्मपुजेंचा रोष इतका भयावह असतो की, आजुबाजुला होणा-या परिवर्तनाचा व बदलाचा विचार रोग्याच्या मनाला स्पर्शत नाही. सामाजिक वास्तव, संस्कृती आणि माणुसही विकसित झालेला असता हे मानायला हा रोगी तयार नसतो. हिंदुंच्या बाबतीत बोलायचे ठरले तर आपणास असे दिसते की, या देशावर व समाजजीवनावर परिणाम करणारी अनेक परकीय, राजकीय, धार्मीक, सांस्कृतीक आक्रमणे झाली. या परकियांनी इथल्या समाजाला अनेक नवीन गोष्टी दिल्या. हे अनेक परकीय सहजपणे इथल्या समाजजीवनात मिसळून गेले. विशेषत: येथे जे अनेक इस्लामिक आक्रमक आले आणि जवळजवळ त्यांनी पाचशे वर्ष राज्य केले त्यांनी येथे नवीन शासन व्यवस्था दिली, काही नवीन विचार दिले, भारतीय समाजामधल्या अनेकांना इस्लाममध्ये येण्याचे आमंत्रण दिले व प्रसंगी आपल्या राजकीय सत्तेच वापर करुन अनेकांचे सक्तीने धर्मांतर घडवून आणले. हे उघडपणे घडत असतानाही इस्लामला विरोध करण्याचे बळ हिंदूजवळ नव्हते ही वस्तुस्थिती आहे. कारण हिंदु - हिंदु संस्कृतीच्या श्रेष्ठत्वाच्या भावनेत आत्ममग्न होते. राष्ट्राच्या वैभवशाली व समाजविकासासाठी ज्या नैपूण्याची आणि क्षमतेची आवश्यकता होती ती क्षमता हिंदू समाजाने गमावलेली होती. हिंदू संस्कृतीमधील ज्या गोष्टी कालबाहय ठरलेल्या होत्या, त्यांचा त्याग करून एकसंघ समाज निर्माण करण्यासाठी हव्या असलेल्या नवीन जीवनमुल्यांचा स्विकार करण्याची वृत्ती हिंदू संस्क्तीने स्विकारल्या नाहीत. हिंदूच्या मनातील सांस्कृतिक श्रेष्ठत्वाच्या अहंकाराने जगातील इतर मानव समुहांशी आणि हिंदू समाजातील अंत्यंज वर्णातील ज्ञानवादी असलेले संबंध तोडले. याचाच परिणाम म्हणून हिंदू समाज वर्ण व्यवस्थेला व जातीय चौकटीच्या अयामाबाहेर जावू शकला नाही. आणि स्मृती - पुराणोक्त विचार परंपरेच्या परिघाबाहेरच्या विचार परंपरेचा जाणीवपूर्वक अभ्यास व स्विकार करू शकला नाही. पाश्चात्यांची आधुनिकता, त्यांची विज्ञान - निष्ठा आपण स्विकारली पाहिजे. या विचारांचा स्पर्शही इथल्या समाजसुधारकांना होवू शकला नाही. स्वा. सावरकरांसारख्या बुध्दीनिष्ठ प्रज्ञावंताने भारतीय संस्कृती व समाजातील आत्ममग्न वृत्तीचा व दोषांचा विचार करून सावरकरवादी नवीन विचार मांडला. परंतु सावरकर वादाला कडाडून विरोध करतात. व सावरकरांना परंपरागत सनातनवादाचा आशय होण्याचा यशस्वी प्रयत्न इथल्या धर्मपंडितानी व वरिष्ठ वर्णीयांनी केला. हे लक्षात घेण्यासारखे आहे. सावरकरांचा नव्याने विचार करण्याची गरज आता निर्माण झालेली आहे.

### संघाचा आधुनिक जीवनमुल्यांना विरोध:-

संघ आधुनिक ज्ञान विज्ञानाच्या आदी आधुनिक जीवनमुल्यांच्या विरोधात आपले विचार स्पष्टपणे मांडतो. आधुनिक जीवनाला व मानवतावादाला पोषक असणारे, स्वातंत्र्य, समता, न्याय व या मुल्यांवर अधिष्टित असलेली लोकशाही संघाला मान्य नाही. या सर्व जीवनमुल्यांची आणि भारताने स्विकारलेल्या लोकशाही शासन व्यवस्थेची संभावना करताना भारतीय आत्मा नसलेली राजकीय व्यवस्था असा उल्लेख गुरुजींनी केलेला आहे. प्रादेशिक राष्ट्रवादाच्या संकल्पनेसंबंधी गुरुजींनी प्रादेशिक राष्ट्रवादाचे सिंध्दात Abswcdily of Territorial Concept आणि राष्ट्रवादाचा धर्मशाळा सिंध्दांत Sarai of Territorial Nationlism अशी संभावना केलेली आहे. गुरुजींना अभिप्रत असणारा सांस्कृतीक राष्ट्रवाद प्रादेशिक राष्ट्रवादाच्या संकल्पनेत आढळत नाही.

आजच्या जगाने सुसंस्कृत आणि समृध्द जीवन जगण्यासाठी काही आधुनिक जीवनमुल्यांचा विचारपूर्वक स्विकार केलेला आहे. मध्ययुगीन कालखंडातील मानवी जीवनात उच्च विचारांची भावना स्थिरावलेली होती. त्याचाच एक दृश्य परिणाम म्हणजे समाजात अस्तित्वात आलेली सामाजिक विषमता, एक नवीन समृध्द समाजजीवन निर्माण करण्यासाठी समता, बंधुता, व्यक्तिस्वातंत्र्य आणि न्याय या तत्वावर आधारित राजकीय लोकशाही भारतीयांनी स्विकारलेली आहे. समाजजीवनात धर्मनिरपेक्षता आणि लोककल्याण काही राज्यांचा पुरस्कार केलेला आहे. आजच्या जगात आर्थिक जीवनात काही लोकांनी व देशांनी उदारमतवादी अर्थव्यवस्था, काहींनी लोकशाही समाजकारी व्यवस्था, तर काहींनी मुक्त अर्थव्यवस्थेचा स्विकार केलेला आहे. आधुनिक विज्ञान आणि भौतिक क्षेत्रातील प्रचंड प्रगती व त्यासाठी आधुनिक तंत्रज्ञान, यामुळे मानवी जीवन गतीमान झालेले आहे. तसे पाहता भारतीय समाजाने या सर्व बाबींचा स्विकार केलेला आहे. या संबंधात गुरुजीची नेमकी भूमिका कोणती?

मुसलमानांची जशी उभ्या मुस्लिमावर श्रध्दा आहे त्याच धर्तीवर हिंदुचीही एक संघटना असावी म्हणून गुरुजींनी विश्वहिंदू परिषदेची स्थापना केली. तिच्या स्थापनेनंतर १९६६ च्या जानेवारी महिन्यात तिचे पहिले जागतिक संमेलन कुंभमेळयाच्या प्रसंगी प्रयाग येथे घेण्यात आले. त्या संमेलनात मार्गदर्शन करताना गुरुजी म्हणाले, कधीकधी लोक असे म्हणतात की, आजचे युग विज्ञानयुग आहे, तेव्हा विज्ञानयुगाशी जुळवून घेण्यासाठी आपल्याच धर्मात परिवर्तन केले पाहिजे. मी उलट असे म्हणालो की, आपल्या धर्माशी मेळ बसेल या प्रकारे विज्ञानाचा उपयोग केला पाहिजे जर विज्ञानातील दर एक संशोधनागणिक धर्मात परिर्वन केले तर धर्म हा धर्मच राहणार नाही. तिथे समाजाची धारणाही होत नाही. लोकांची कर्तव्ये ही नीट ठरत नाहीत. लोकांच्या इहलोकीच्या व परलोकीच्या कर्तव्याचा मार्ग सापडत नाही आणि सर्व मानवजात उत्सन्न होऊन जाते म्हणून विज्ञानातील संशोधनागणिक धर्मात परिवर्तन करण्याचा विचार अनिष्ठ विचार आहे. गुरुजींचा हा विचार वस्तुत विज्ञानाचे हिंदुकरण करण्यासारखा आहे.

लोकशाही आणि साम्यवाद या जडवादी विचारपरंपरेवर उभे आहेत. त्या भौतिक वादाला गोळवळकर गुरुजींचा पूर्ण विरोध आहे. तसेच त्यांचे गैरसमज पण आहेत. भौतिकवादासंबंधी गोळवळकर गुरुजींनी केलेल्या अपप्रचार हा जाणीवपूर्वक आणि नियोजनबध्द आहे यात कसलीच शंका नाही. मनुष्यप्राणी भौतिक गरजांचे गाठोडे आहे.

वस्तुत भारतीय तत्वज्ञान्यांनी किंवा पाश्चात्य विचारवंतानी मानवी जीवनाचा आणि मनुष्यप्राण्याचा विचार केवळ भौतिक गरजांचे गाठोडे या मर्यादित अर्थाने कधीच केलेला नाही. भारतीय विचारपरंपरेत जडवादी विचारपरंपरा ही सातत्याने मांडली गेलेली आहे. आणि तिचा विकासक्रम हा सतत वाढतोच आहे. जडवादी व भौतिक विकासाबरोबर होत गेलेली मानवी प्रगती आणि त्याला मिळत गेलेली समृध्दी हे मानवी विकासक्रमातील वास्तव आहे. तसे पाहता व्यक्तिस्वातंत्र्य, लोकशाही, विचारपरंपरा, सरंजामशाही अर्थव्यवस्थेतून औदयोगिक अर्थव्यवस्थेकडे होत गेलेल्या संक्रमनाचा हा इष्ट परिणाम आहे. सरंजामशाही व जमीनदारी व्यवस्थेत कुंठीत झालेले मानवी जीवन औदयोगिक क्रांतीमुळे मुक्त झाले तसेच प्रवाही झाले. त्याचाच परिणाम म्हणून व्यक्ती, समाज, राज्य, धर्मसत्ता अशा प्रत्येक संस्थेचा स्वतंत्रपणे विचार होऊ लागला. गुरुजींना अभिप्रेत असलेली समाजरचना ही चार्तुवर्ण्यधिष्टित आहे. म्हणून चार्तुवर्ण्याला छेद देणारी लोकशाही विचारपरंपरा गुरुजींना मान्य नाही. हे खेदाने नमुद करावे लागते.

श्री मा. स. गोळवळकर गुरुजींनी विज्ञानाला आणि जडवादाला गौणत्व दिले आणि नाकारले. जडवादी विचारपरंपरेला नाकारुन चैतन्यवादी परंपरेतील परमेश्वर, धर्म, धर्मग्रंथ इ. ना महत्व देऊन आधुनिक विचाराला आणि नवीन समताधिष्ठीत तत्वावर आधरीत नवसमाजरचनेला त्यांनी विरोध दर्शविला आहे. गुरुजी म्हणतात पृथ्वीवरील समस्त जीवसृष्टिला स्वतचा संपूर्ण विकास करण्याची पुर्ण आणि मुक्त संधीही हा हिंदू विचारच करुन देऊ शकेल. हे ज्ञान केवळ हिंदूपाशीच सुरक्षित राहिलेले आहे. जणू नियतीनेच हिंदूच्या हाती हा महान दैवी ठेवा सोपवलेला आहे. गुरुजींच्या मते हा अमुल्य ठेवा ऋग्वेदाच्या पुरुषसुक्तात आहे. तो असा

ब्राम्हणोःस्त्र मुखमासीत ।बाहु राजन्यः कृतः।

उरु तदस्य यद् वैश्यः । पद्भ्यां शुद्रो अजायत ॥

ही वेदकालीन समाजरचना आहे. आपल्या पूर्वजांनी असे सांगितले आहे की, आपला समाज हाच अराध्य परमेश्वर आहे. ब्राम्हण त्याचे मुख आहेत, क्षत्रिय बाहू, वैश्य त्यांच्या मांडया व शुद्र त्याचे पाय आहेत. गोळवळकरांनी लोकशाही समाजवादी आधुनिक समाजरचनेला नकार देवून प्राचीन चार्तुवर्ण्य व्यवस्था हीच आदर्श समाजव्यवस्था मानली. कारण त्यांना अभिप्रेत असणा-या विषय भौतिक जीवनावर उभ्या असणा-या समाजव्यवस्थेची ती एकमेव जननी आहे. काळौद्यात या ऋगवेदकालीन समाजव्यवस्थेपासून भारतीय समाज दुरावला म्हणून त्याची अवनती झाली, समाज चारित्र्यहीन झाला, तो पौरूष्यहीन झाला असे ते सांगतात, भारीतय समाज पुन्हा एक बार समर्थ समाज म्हणून उभा करावयाचा असेल तर ते म्हणतात की, आपल्याला हिन्दू धर्माचे पुनर्जीवन आणी सरंक्षण केले पाहिजे.

गोळवळकर गुरूजी आपल्या वरील मताच्या पृष्ठयर्थ भगवद गीतेतील विचारांचा दाखला देतात. स्वधर्मे निधन श्रेयः परधर्यो भयावहः॥ धर्माने नेमून दिलेली कर्मे असता मरण आले तरी ते श्रेयकर आहे. हिंदू धर्मातील चार्तुवर्ण्याधिष्ठीत आदर्श समाज व्यवस्थेत प्रत्येक वर्गाला जी कर्मे निश्चीत केलेली आहेत, ती कामे व्यक्तीने मरणालासुध्दा न घाबरता केली पाहिजेत. कर्म आणि धर्म हे आपल्या संस्कृकीत एकरूप आहेत. त्यात भिन्नता नाही. म्हणून व्यक्तीप्रमाणे राष्ट्रही आपल्या स्वधर्माच्या मुळाला चिकटून राहिले तरच त्यांची सर्वागींण उन्नती होते. वैभवाने ते बहरते. स्वधर्माचीमुळे उपटून टाकून त्या जागी दुसरे काही लावले तर त्यातून अव्यवस्था आणी अधःपात मात्र ओढवेल.

वरील विचारामधुन गोळवळकर गुरूजीना स्थितीवादी विचार मान्य आहे हे स्पष्ट होते. इस्मामिक आक्रमण, त्याची आणि युरोपियनाच्या संस्कृतीपून भारतीय समाजाने काही प्रेरणा घेतल्या. त्यांच्या जीवनपध्दती स्विकारल्या. बहूजन समाजाने विद्यार्जन करून स्वतःच्या जीवनाविषयक दृष्टिकोन बदलला. त्याचाच परिणाम म्हणून भारतीय समाजात

गतीमानता येवून सामाजिक अभिसरण सुरू झाले. स्वातंत्र्य, समता, बंधुत्वभाव ही मुल्ये भारतीय समाजाला प्रेरक ठरली. जातीबध्द समाजव्यवस्था काहीशी खिळखिळी झाली. गुरूजीना हे मान्य नाही. हे सर्व हिन्दू जीवन पध्दतीविरूध्द झालेले आहे असे गुरूजीना वाटते. म्हणून ते म्हणतात.

या पवित्र भूमिच्या राष्ट्रीय अत्म्याची विशुध्द ज्योत पुन्हा एकदा झळाळून उठावी, म्हणून हिंदू मनातील युगानुयुगीच्या अमर अग्णीवर आत्मविस्मृतीची व परानुकरणाची चढलेली राख झटकून टाकून हिंदू जीवनपध्दतीचे पुनरूज्जीवन करणे हाच आजचा आपला राष्ट्रधर्म आहे.

हा हिंदू दृष्टीकोन हिंदूस्थानचा विधायक दृष्टीकोन आहे. असे गुरूजी म्हणतात, घ्ज्या गौरवसंपन्न परंपरेत वशिष्ठ, विश्वामित्र, कृष्णदेवराय, चाणक्य, विदयाचरण, समर्थ रामदास निर्माण झाले आणि श्रीराम, चंद्रगुप्त, कृष्णदेवराय व शिवाजी यांच्या रूपाने जी बहरली त्या परंपरेचे आपण पुजन करू. गोळवळकराच्या या परंपरेत बुध्द, महावीर, चार्वक, तुकाराम, अशोक आणि अकबर इ. नावे नाहीत. गोळवळकरानी सांगितलेली परंपरा ही ब्राम्हणी वर्चस्व असणा-या समाजाची परंपरा आहे आणि त्या परंपरेचे पुनरूज्जीवन करणे हे राष्ट्रीय स्वयं सेवक संघाचे कार्य आहे.

गोळवळकर गुरूजीनी आपल्या विचार धनात भारतीय इतिहासाची आकर्षकपणे मांडणी केलेली आहे. परंतु हा इतिहास समाजवास्तवाला धरून नाही. त्यामध्ये इतिहासाचे वस्तुनिष्ठ आणि शास्त्रीय विवेचन नाही. समाजवादी विचारचंतानी ज्या इतिहासाची भौतिक मिमांसा केली ती पध्दत गुरूजीना मान्य नाही. समाजवादी तत्वज्ञानातील आर्थिक समतेच्या तत्वावर त्यांचा विश्वास नाही. म्हणून गुरूीना लोकशाही समाजवाद नको आहे. किंबहूना आधुनिक जीवनप्रणाली, तत्वज्ञान व समतेच्या सिध्दातावर आधारलेला नवसमाज त्यांना नको आहे.

## राष्ट्रीय स्वयं सेवक संघाचा राष्ट्रवाद

रा. स्व. संघ ही डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांची निर्मीती होय. रा. स्व. संघाचे सक्रीय स्वयंसेवकाच्या मते, रा. स्व. संघ हे के. ब. हेडगेवाराच्या दूरदृष्टीचे मुर्तरूप होय. हे एक न भुतो, किंवा या सम यां श्रेणीतील कार्य आहे. त्याच्या सारखे दुसरे कार्य इतिहासात किंवा वर्तमानात दाखविता येत नाही. हिंदू समाजाला सशक्त संघटीत करण्यासाठी संघ कार्य सुरू करण्यात आलेले आहे. हे त्याचे स्पष्ट प्रतिपादन आहे. त्यात कोठेही संदिग्धता नाही.

संघाचे सक्रीय स्वयंसेवक डॉ. तुपकरी आपल्या वैज्ञानिक दृष्टीकोनातून रा. स्व. संघ या ग्रंथामधून संघाला अभिप्रेत असलेल्या राष्ट्रवादाचा विचार मांडतात - ते म्हणतात - भारतात अनादीकाळापासून चालत आलेले समाजजीवन म्हणजे हिंदूत्व. एवढया विशाल व विविधतेने नटलेल्या भूप्रदेशावर जे एकात्म समाजजीवन उभे राहिले तीच तेथील हिंदू संस्कृती. ज्या हिंदू शिळाचे व चारिञ्याचे उन्नयन करणे, म्हणजेच हिंदू राष्ट्र निर्मीती. शाश्वत हिंदू जीवन मुल्यावर आधारीत काळमानानुसार पुन्हा एकदा येथील हिंदू समाजाला सुव्यवस्थीत व संघटीतस्थितीत आणणे हे संघाचे खरे कार्य १९. (वैज्ञानिक दृष्टीकोनातून रा. स्व. संघ पृ. ५१).

हिंदू राष्ट्रनिर्मीतीसाठी आवश्यक असणा-या नेतृत्वाची निर्मीती करण्यासाठी शारिरिक, बौध्दिक व मानसिक संस्कार देणारी संघटना - दैनिक संघशाखा, दैनिक संघ शाखेत मुलाना व तरूणांना दिला जाणारा संस्कारमय विचार, स्वयंसेवकाच्या विशुध्द चारिञ्य निर्मीतीस उपयुक्त ठरणारा व त्यांच्या मनात राष्ट्राविषयी पुज्यभाव निर्माण करणरा. इग्लंड इंग्रजाचा, फ्रान्स फ्रेंचाचा, जर्मनी जर्मनाचा त्याचप्रमाणे हिंदूस्थान हिंदूचा हा रा. स्व. सेवक संघाच्या विचाराचा गाभा आहे. संघशाखेच्या किंवा संघाच्या अन्य कोणत्याही कार्यक्रमांत पुजा, अर्चा इ. पारंपारिक गोष्टींचा समावेश नाही. कारण संघ ही धार्मिक कार्य नव्हे किंवा केवळ सामाजिक कार्य नव्हे तर राष्ट्रीय कार्य होय. राष्ट्रीय म्हणजे जे संपुर्ण समाजाला भावनिक दृष्टीने एकत्र बांधते.

डॉ. हेडगेवाराना अभिप्रेत असलेला राष्ट्रवाद सामान्य माणसापर्यंत कसा प्रवाहीत करता येईल या संबंधीचा विचार त्यांनी समर्थ रामदासाकडून स्विकारला असे तुपकरी म्हणतात. श्री. शिवाजी महाराज व त्यांचे गुरू समर्थ रामदासस्वामी ही डॉ. हेगगेवारांची दैवते होती. संघाच्या संघटन तंत्राची कल्पना त्यांनी रामदासस्वामीनी ज्या प्रकारे गावोगावी हनुमान मंदिरे स्थापून, तेथे शारिरिक आणि बौध्दिक कार्यक्रमाची आखणी करून समाजकारण केले. त्या उपक्रमातून मिळाली असण्याची फार शक्यता आहे. त्या मुळेच सुरूवातीच्या संघात रामदासीकृत प्रार्थना होती. अर्थात रामदास स्वामीच्या दासबोध या ग्रंथाचा प्रभाव डॉ. हेडगेवार, श्री गुरुजी व श्री देवरस या तीनही सरसंघचालकावर पुरेसा होता, हे म्हणणे क्रमप्राप्त आहे. (दासबोध, सार्थ, बेलसरेकृत).

श्री. बेलसरे सार्थ दासबोध या ग्रथांत पुढे म्हणतात, रामदास स्वामी प्रत्यय व प्रचिती म्हणजेच प्रत्यक्ष अनुभवावर वारंवार जोर देतात. विवेकावर भर देणारे, प्रत्यक्ष व प्रचिती दासबोधात पदोपदी आढळतात. सतराव्या शतकांत जेव्हा पाश्चात्य विज्ञानाचा भारतात मागमोसही नव्हता तेव्हा समर्थानी विवेकावर एवढा भर दिला हे विशेष. समर्थानी त्या काळांत

लोकजागरण, लोकसग्रंह व लोक संस्कार करून समाज संघटनेचे मोठे कार्य केले. डॉ. हेडगेवारावर या दासबोधाचा पुरेसा परिणाम झालेला होता. (बेलसरे कृत - सार्थ दासबोध).

हिंदू समाजाचे संघटन होण्याच्या दृष्टीने डॉ. हेडगेवारानी जे समाजशास्त्रीय चितंन केले, ते कोणत्या स्वरूपाचे आहे? त्या संबंधी तुपकरी विश्लेषण करतात - संपुर्ण हिंदू समाजालाच त्याच्या स्वत्वाचा अभिमान जागृत करून त्यात सुसंघटीत कृतिशीलता निर्माण केल्याशिवाय भारताचे सांस्कृतिक - राष्ट्रीय उन्नयन शक्य होणार नाही. राष्ट्रीय पुनर्निमाणाला आवश्यक प्रतिभाशाली नेतृत्व प्रथम समाजात विकसीत करावे लागेल. त्या शिवाय प्रगती अशक्य आहे. डॉ. हेडगेवारानी असे प्रतिभावान नेतृत्व उत्पन्न करणारी पध्दती शोधून काढली. संघाची दैनिक शाखा पध्दती हीच ती पध्दती. याव्दारे त्यांनी प्रतिभावान नेतृत्व निर्माण करण्याचा एक कारखानाच संघ शाखा स्वरूपांत विकसीत केला. हा उपक्रम आजतागायत सुरू आहे. याच संदर्भात पुढे ते म्हणतात, हिंदू राष्ट्र पुर्ननिर्माणाकरीता त्यांनी संघाव्दारे स्वयंसेवक घडविण्याची योजना आखुन मुर्त रूप दिले. अशाना त्यांनी सक्रीय स्वयंसेवक ही संज्ञा दिली. त्यांच्या कल्पनेतील सक्रीय स्वयंसेवक म्हणजे राष्ट्रीय व वैयक्तिक चारिञ्याने ओतप्रोत, समाजाची जाण व आस्था असणारा नेतृत्व क्षमता असणारा, राष्ट्रीय प्रगतीची कळकळ असणारा, सृजनशिल व संघटीत असा कार्यकर्ता प्राप्त परिस्थितीचे आव्हान स्विकारून राष्ट्रीय पुर्ननिर्माणाकरीता नेतृत्व करण्याची त्याच्याकडून अपेक्षा आहे.

सक्रीय स्वयंसेवक हा वरील आशयाच्या अनुषगांने निर्माण करणे हे संघाचे उद्दिष्ठ आहे. यांची निवड कशी करावयाची याचाही ते पुढीलप्रमाणे खुलासा करतात. राष्ट्रपुनर्निमाणार्थ हे सक्रीय स्वयंसेवक शहरी लोकसंख्येच्या ३ टक्के व ग्रामीन लोकसंख्येच्या १ टक्के आवश्यक आहेत. असे डॉ. हेडगेवारांचे प्रतिपादन आहे. डॉ. हेडगेवार हे कृतीशील, समाजशास्त्री असल्यामुळे त्यांनी राष्ट्रीय पुनर्निमार्णाचा विधीही सांगितलेला आहे. या ३ टक्के आणि १ टक्के सक्रीय सेवकांनी समाजजीवनांत अनुक्रमे ९७ टक्के व ९९ टक्के लोकांना बरोबर घेवून, जीवनाच्या सर्वच क्षेत्रात बहुसंख्याकांना कृतीशील करून हे सक्रीय स्वयंसेवक त्या त्या अगांतील आव्हानाना योग्य तो प्रतिसाद देत. त्या त्या क्षेत्रांत हिंदू राष्ट्र निर्माण करण्याचा प्रयत्न करतील, अशी व्यापक योजना त्यांनी संघरूपात १९२५ साली आणली.

संघ आणि संघाचे सक्रीय कार्यकर्ते हे नेमके कोण? कोणत्या वर्णाचे् व कोणत्या जातीचे ? या संबंधी डॉ. तुपकरी आंगी गोळवळकरांनी उघडपणे सांगण्याची गरज नाही. संघाचे एकूण स्वरूप लक्षांत घेतल्यास संघातील सक्रीय स्वयंसेवक हा ब्राम्हणच असतो हे निश्चीत. ३ टक्के आणि १ टक्के उच्च विद्याविभूषीत स्वयंसेवकाशिवाय उर्वरीत बहूजन समाज हा आजच्या ब्राहमणी परंपरापणाच्या मुखडाच्या दृष्टीने शुद्र समाज. शुद्र वर्गवारी, सवर्ण आणि अस्पृश्य व अत्यंज हा संपुर्ण वर्ग ब्राम्हणी नेतृत्वाच्या आदेशानुसार हिंदू राष्ट्र निर्मीती प्रक्रियेत सहभागी होणार. याचाच अर्थ असा हिंदू राष्ट्र पुनर्निमाण हा चार्तुवर्ण्यधिष्ठित, ब्राम्हणी नेतृत्वाचा अधीन राहून जीवन व्यतीत करणारा समाज.

डॉ. तुपकरी म्हणतात, डॉ. हेडगेवार व श्री गुरूजीवर समर्थ रामदास स्वामी आणि त्यांच्या दासबोध या ग्रंथाचा फार मोठा प्रभाव होता. किंबहूना शाखा, संघशाखा प्रत्येक गावात उभी करून लहान मुलाना आणि तरूणाना राष्ट्रकार्यात गुतंविणे हे संघाचे उद्दिष्ठ आहे. परंतू खेदाने असे म्हणावे लागते की, समर्थ रामदासांची भूमिका आणि विचारांची मांडणी विवेकी असून ही जातीय अहंकार व हित सांभाळणारी आहे. दशक पांच, समास एकमधील या काही ओव्या.

गुरू तो सकळासी ब्राम्हण। जरी तो झाला क्रियाहीन॥
तरी तयासीच शरण। अनन्यभावे असावे॥
ब्राम्हण वेंद मुर्तीमंत। ब्राम्हण तोची भगवंत॥
पुर्ण होती मनोरथ। विप्रवाक्ये करूनी॥
लक्ष भोजनी पुज्य ब्राम्हण। आज जातीसी पुसे कोण॥
तरी भंगवंतासी भाव प्रमाण। येरा चाड नाही॥
असी ब्राम्हण सुरवर वंदिती। तेथे मानव बापुडे किती॥
जरी ब्राम्हन मुढमती। तरी तो जगद्वंद्य॥
अंत्यज शब्ददाता बरवा। परि तो नेवून काय करावा॥
ब्राम्हणा सन्मिध्द पुजावा। हे तो न घडे की॥.

समर्थ रामदासाचा ब्राम्हणासंबंधीचा दृष्टीकोन आणि उर्वरीत बहुजनाबद्यलचा भाव लक्षांत घेण्यासारखा आहे. डॉ. हेडगेवाराच्या संघटन चातुर्यसंबंधी अधिक स्पष्टीकरण करताना डॉ. तुपकरी, डॉ. टॉयनबी या पाश्चात्य तत्वज्ञाच्या सघंटन सिध्दांताचा अधार घेतात. सघंटन हे प्रतिभावान अल्पसंख्य व तेवढी प्रतिभा नसलेले शेष बहुसंख्य यांचे मिळूनच होते. ते

केवळ बहूसंख्याकाचे किंवा प्रतिभावान अल्पसंख्याकाचे अलग असे कधीच नव्हते. पुढे ते म्हणतात - डॉ. हेडगेवाराच्या या समाजशास्त्रीय जाणीवा परिपुर्ण होत्या. त्यामुळेच त्यांनी ३०% आणि १०% संघटन करण्याची भाषा कधीच केली नाही. हे ३० % व १० % समाज जीवनातील विविध क्षेत्रातील उर्वरीत बहूसंख्याकाना बरोबर घेवून, त्यांच्या समवेत संघटना उभारून समाजोध्दाराचे संघटीत प्रयत्न करतील. हीच त्यांची भाषा होती. आजही तीच आहे. संघात याबद्यल कोणताच भ्रम नाही. म्हणूनच संघ नेहमी हिंदू समानाचे संघटन करण्याची भाषा करतो.

संघाची हिंदू संघटन घडवून आणावयाची आकांक्षा आणि उद्यिष्ठ वस्तुतः किती प्रमाणांत साध्य झालेले आहे? इ. स. १९२५ ते २०१० या प्रदिर्घ अशा ८५ वर्षाच्या कालखंडात संघाने नेमके काय साधले, संघाने आपला परिवार वाढविला, कार्यक्षेत्र वाढविले पण प्रत्यक्षांत जो भारतीय जनसमूह आहे हया जनसमुहाशी मानसिक ऐक्य साधण्यात संघ कितपत यशस्वी ठरलेला आहे? यांचा वस्तुनिष्ठ तपशिल अभ्यासणे गरजेचे आहे.

डॉ. हेडगेवारांना अभिप्रेत असणारे हिंदू सघंटन आणि राष्ट्रीय पुनर्निर्माण कोणत्या सिंध्दतावर आधारीत होत आहे, याचे विवेचन आतापर्यंत आपण पाहिलेले आहे. संघाच्या राष्ट्रवाद हा हेडगेवार प्रणीत हिंदू संघटन आणि गोळवळकर गुरूजी प्रणीत राष्ट्रवादी विचारासी निगडीत आहे. गुरूजी नेमकेपणाने राष्ट्रवादाची मांडणी कोणत्या मुद्यांवर आधारीत करतात हे पाहणे श्रेयस्कर ठरेल.

राष्ट्रवादासंबंधीचा विचार गोळवळकर गुरूजीनी त्यांच्या विचारधन मध्ये पृ. १०९ वर मांडलेला आहे. ते म्हणतात, आधुनिक राज्यशास्त्र असे मानते की, राष्ट्र हा अशा प्रकारचा जनसमुदाय असतो की, ज्यात जीवनाचे समान आदर्श, एकच संस्कृती, समान समभावना, समान निष्ठा आणि समान परंपरा असते व त्या मुळे त्या समाजाची एक विशीष्ठ जीवनपध्दती विकसीत होत असते. थोडक्यात म्हणजे एखादया विशीष्ठ भूभागावर राहणा-या आणि समान परंपरा व आकांक्षा, भूतकाळातील अनुभवाच्या समान स्मृती, शत्रु - मित्रत्वाच्या समान भाव - भावना आणि सर्वांचे एकमेकाशी असलेले निगडीत हितसंबंध अशा एक संघ जनसमुहाला राष्ट्र म्हणावे.

गुरूजीनी राष्ट्रवादाची मांडणी ज्या पध्दतीने केलेली आहे त्यातील कसोटीच्या आधारे भारतीय समाजाला एक राष्ट्र म्हणता येईल काय? गोळवळकर गुरूजी राष्ट्रासंबंधी भारताच्या बाबतीत जो विचार मांडला तो कोणता? हिमालयातुन - दक्षिणेकडे हिंदी महासागरापर्यंत, पुर्व - पश्चिम अखंड एक संघ असा भूप्रदेश, एकत्रित विचार करून त्या वर हिंदू म्हणून ओळखला जाणारा व या भूप्रदेशात वास्तव्य करून राहणारा, आणि हा समाज जो या एकसंघ भूप्रदेशाला भक्तीने आणि प्रेमाने मातृभूमी म्हणून संबोधतो. त्या हिंदू समाजाच्या पुर्वजानी ज्या धार्मिक परंपरा व श्रध्दा निर्माण केल्या, जी पवित्र क्षेत्रे निर्माण केली, ती समाज भावबंधनाने एकात्म आहे. गोळवळकर प्रणीत राष्ट्रवादाला अभिप्रेत असणारा एकात्मतेच्या भागा वरील विवेचनात स्पष्ट झालेला आहे.

भूप्रदेशाविषयी असणारी भक्ती व निष्ठा या बरोबरच गोळवळकरांनी धर्म या कल्पनेला महत्व दिलेले आहे. हिंदू धर्म हा जगातील सर्वश्रेष्ठ धर्म असून, ऋ गवेदांत वर्णन केलेली चातुर्वर्ण्य व्यवस्था म्हणजे सर्वशक्तीमान परमेश्वराचेच चातुर्विध स्वरूप आहे. समान प्रतिष्ठेवर आधारलेले चातुर्वर्ण्य ही चातुर्वर्ण्यामागील मुळ कल्पना आणि हे त्याचे खरे स्वरूप असून, आजची जातीसंस्था हे त्याचे विकृत स्वरूप आहे. ही आजची जातीसंस्था नष्ट करणे आणि वर्गविहीत समतेवर आधारलेला समाज निर्माण करणे, म्हणजे सारे शरीर वर्गविहीत करण्यासाठी कापून टाकणे होय. इतकेच नव्हे तर जातीसंस्था ही भारतीय समाजाला गेल्या हजार वर्षाच्या इतिहासांत उपकारच ठरलेली आहे, कारण गेल्या हजार वर्षाच्या इतिहासांत देशावर परक्याची आक्रमणे झाली, परंतु आपल्या राष्ट्रातील ज्या दुहीमुळे आक्रमकाना आपल्यावर विजय संपादन करता आला, त्याच्या मुळाशी जाती - जातीतील वैमनस्य होते असे सिध्द करणारे एकही उदाहरण नाही.

जाती विरहीत समाज परकीय आक्रमनाला जेवढे सहजा - सहजी बळी पडले, त्याच्या तुलनेत भारत आक्रमनाना बळी पडला नाही, याचे कारण भारतात असलेली जाती व्यवस्था असे गुरूजीचे म्हणणे आहे.

संघाच्या दृष्टीने हिंदूत्व हेच राष्ट्रीयत्व. भारतीय भूप्रदेशाच्या प्रत्येक धुलीकणामध्ये देवत्व भरलेले आहे. आम्हाला या भूमीहून अधिक पवित्र असी कोणतीही गोष्ट नाही. या भूमीच्या प्रत्येक धुळीकण, प्रत्येक सचेतन - अचेतन वस्तु, प्रत्येक भाषा, प्रत्येक दगड, वृक्ष, नदी आम्हास पवित्र आहे. असे विचार व्यक्त करणा-या गोळवळकर गुरूजीना भारतीय माणसा संबंधी काय वाटते? राष्ट्रवाद ज्या मानवी समूहाच्या ऐक्यावर व एकत्वाच्या भावनेवर आधारीत असतो - त्या मानवी समूहासंबंधाचा त्यांचा दृष्टीकोन कोणता आहे? वस्तुतः राष्ट्र हे त्या राष्ट्रातंर्गत राहणा-या मानवी समूहाच्या कल्याणासाठी आणि समृध्दीसाठी असते. राष्ट्र हे व्यक्तीसाठी की व्यक्ती ही राष्ट्रासाठी? राज्य आणि व्यक्ती यांचे परस्पर संबंध कसे व कोणत्या सिध्दांतावर प्रस्थापीत करावयाचे? श्री गोळवळकर गुरूजी व्यक्तीला गौणत्व देवून हिंदू राष्ट्र या संकल्पनेला अधिक महत्त्व दिलेले आहे.

पाश्चात्य राजकीय तत्वचिंतनाचे स्वरूप, विकास अभ्यासताना आपणांस व्यक्ती आणि राज्य यांच्या परस्पर संबंधाबाबत सखोल चिंतन पाश्चात्य राजकीय विचारवंतनी केल्याचे जाणवते. जॉन लॉकच्या विचार परंपरेपासून रुसो, जॉन स्टुअर्टमील हे या शतकाच्या प्रारंभापर्यंत सर्वच राजकीय विचारवंत राज्यसंस्था हे मानवी कल्याण साधण्याचे एक साधन आहे. या निष्कर्षापर्यंत केव्हाच पोहंचलेली आहेत. व्यक्ती हे राजकीय व्यवस्थेचे साधन आहे. म. गांधीनी पण सामान्य माणसाला प्रतिष्ठा मिळवून देणे, हे माझ्या राजकारणाचे उद्यिष्ठ आहे, असे म्हटले आहे. गोळवळकर गुरूजीचा व्यक्तीबाबत असणारा दृष्टीकोन भिन्न स्वरूपाचा आहे. गुरूजी म्हणतात, अनंत पिढया आल्या आणि गेल्या, परंतु राष्ट्र टिकून राहिले आहे. राष्ट्रजीवन हे नित्य आणि व्यक्ती अनित्य आहे. म्हणून या समाजाची अनित्य असलेली व्यक्ती, नित्य असलेल्या समाजाचे हित साधण्याचे साधन होईल.

व्यक्तीला एक साधन माननारा हिंदूत्ववादी विचार लोकशाही मुल्याशी विसंगत असणारा आहे. म्हणून हिंदूत्ववाद्यांना लोकशाही मान्य नाही. रा. स्व. सेवक संघाला अभिप्रेत असणारा राष्ट्रवाद - हिंदू राष्ट्रवाद असून - भारतातील बहूसंख्य समाज हा हिंदू असल्याकारणाने - हिंदूचा - हिंदूत्ववाद हाच खरा राष्ट्रवादः संघाला अभिप्रेत असलेला राष्ट्रवाद हा भारतीय भूप्रदेशावर जीवन जगणा-या सर्व वांशिक घटकाना समावून घेणारा आहे काय? भारतीय समाजाचे एकूण स्वरूप लक्षात घेतल्यास इथे विभीन्न चाली रिती, सास्कृंतिक वेगळेपण, भिन्न देवतावाद, अनेक भाषा, संप्रदाय, परस्पर विरोधी विचार परंपरा अशा वेगवेगळया गुण घटकानी अस्तित्वात असलेला समाज. गुरूजीनी अभिव्यक्त केलेल्या राष्ट्रवादाच्या व्याख्येच्या कसोटीस टिकणार आहे काय? आपल्याकडे भाषावाद, प्रांतवाद, धर्मवाद, जातीवाद वगैरे सारखे वाद - वस्तुतः राष्ट्रके आहेत. भारतीय समाज हा मिश्रीत समाज असून अनेक राज्यांचा ते समुह आहे, हे उघड आहे. अशा मिश्रीत समाजामधील राष्ट्रवाद हा त्या समाजामधील प्रबळ राष्ट्राचा राष्ट्रवाद असतो. रा. स्व. संघाला अभिप्रेत असलेला राष्ट्रवाद हा हिंदुत्व हेच राष्ट्रीयत्व या घोषवाक्यात दिसून येतो. हिंदूत्ववाद हाच जर राष्ट्रवादाचा पायाभूत विचार असेल तर इतर राष्ट्राचे किंवा दुर्बळ राष्ट्रकाचे काय? भारतीय भूप्रदेशावर जीवन व्यतीत करणारे सर्वच भारतीय एकत्वाच्या व बंधुत्वाच्या धाग्याने कसे बांधले जातील याचा प्रामुख्याने विचार करणे आवश्यक आहे. या साठी रा. स्व. संघाने काय केले आणि किती प्रमाणात हे ऐक्य साध्य केले, हे उघडच आहे. चातुर्वर्ण्यसम श्रेणीबध्द जातीय व सामाजिक व्यवस्था हा हिंदुत्वाचा मुलभूत विचार भारतीय राष्ट्रवादाला मारक ठरणारा आहे.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वरूप मुलतः जातीयवादी असून संघ स्वजातीच्या वर्तुळाबाहेर वाढू शकलेला नाही. सामान्य माणसाला न्याय देण्याच्या दृष्टीने संघाने आतापर्यंत काही केलेले नाही. गुरूपौर्णीमा, लाठीकाठी, राखी बांधण्याने व त्याला सार्वजनिक रूप दिल्याने चारिज्य बांधणी होत नसते. सामाजिक बांधिलकीचा विचार स्विकारून सामाजिक चळवळी उभ्या करणे, त्या व्दारे सामाजिक जागृती घडविणे, शिवाय आर्थिक स्वावलंबनाचा विचार समाजास प्रदान करून मुक्त व स्वतंत्र विचाराच्या व्यक्तीत्वाची निर्मीती करणे हे राष्ट्रवादाची बांधणी करण्यास उपयुक्त ठरणारा विचार आहे. सामान्य माणसाला सामाजिक आर्थीक न्याय मिळवून देणा-या समाजाची निर्मीती करणारा लोकशाही समाजवादाचा व्यापक विचार राष्ट्रवाद बळकट करू शकतो.

राष्ट्रीय स्वयं सेवक संघ आणि संघाचा राष्ट्रवाद या संबंधीचा तपशीलवार विचार चिकित्सकपणे विचारांत घेतल्यास हिंदूत्ववाद व हिंदूराष्ट्रवाद भारतीय जनसामान्याना न भावणारा आहे हे दिसते. जनसामान्याचे विविध क्षेत्रातील प्रश्न हाती घेवुन लोकशाही मार्गाने जनअंदोलन घडवून आणण्याची इच्छा संघ कधी ही बाळगत नाही. संघाचे तत्वज्ञान लोकशाही मुल्याच्या विरोधी असल्याने संघाला भारताची राजकीय सत्ता फॅसिस्ट मार्गाने हस्तगत करावयाची आहे. त्या साठी सुसंघटीत, सुसज्ज अशी निमलष्करी सुशिक्षीत विशीष्ठ जातीय अंहकार बाळगणारी यंत्रणा कायम ठेवावयाची आहे. भारतीय राजकारणांत सदैव सुंसघटीत ताकद दबावगटाच्या रूपात जागृत ठेवून जे सरकार अधिकारावर असेल त्याला अडचणीत आणून, त्या अडचणीचा फायदा घेवून त्या सरकारला आपल्या जातीय व वर्गीय हित संबंधाना अनुकुल असे निर्णय घ्यावयास भाग पाडणे, हे संघाचे प्रमुख कार्य आहे. जे सरकार अथवा पक्ष संघाचे वर्चस्व मान्य करीत नसेल त्या सरकार व पक्षाविरूध्द संघ जहरी प्रचार करतो व प्रंसगी कारवाया करतो. हिंदू महासभा व संघ कॉंग्रेस आणि संघ यांच्या परस्पर संबंधाचा इतिहास सर्वाना माहीत आहे. सावरकरांचे वर्णन गोळवळकर गुरूजीनी प्रतिक्रीयात्मक हिंदू, किंवा नकारात्मक हिंदूत्ववादी इतकेच नव्हे तर सांस्कृतिक दृष्टया बनलेले मुसलमान या शब्दांत केलेले आहे. आपले दबावगटाचे स्वरूप कायम टिकविण्यासाठी संघ कधी जमीनदार व श्रीमंत व्यापा-याच्या आश्रयाने उभा आहे तर त्यासाठी त्याला समाजादा विरूध्द शत्रु म्हणून व राष्ट्रद्रोही म्हणून घोषीत करावे लागते. ख्रिस्ती आणि मुसलमानाना शत्रु म्हणून घोषीत करणे, संघाला क्रमप्राप्त आहे. संघ कधीही समाज परिवर्तनाच्या चळवळीत उभा राहत नाही. संघाला समाज परिवर्तन नकोच आहे. म्हणून संघ सर्वव्यापी आणि जनसामान्याचा होवू शकत नाही. संघाला जर खरोखरच हिंदू संघटन करावयाचे आहे तर समताधिष्ठीत सिध्दांतावर आधारीत असणारा नवसमाज निर्माण करण्यासाठी संघ सामाजिक चळवळी व अंदोलन

का उभे करीत नाही. संघाला विशीष्ठ वर्गाशिवाय हिंदू समाजामधील इतर घटका विषयी प्रेम नाही. आपल्या राजकारणाची व्याप्ती वाढविण्यासाठी संघाने जसे आपला परिवार विकसीत केला त्या मध्ये इतर जातीय घटकाना संघ प्रवेश देतो म्हणजे काय? आपल्या विचारानूसार त्यांचा राजकारणासाठी उपयोग करून घेतो, ही वस्तुस्थिती आहे. आजच्या भारतीय राजकारणातील भा. ज. प., विश्वहिंदू परिषद, अ. भा. वि. प., बजरंग दल, या विविध संघटनाचे राजकारण त्यांनी निर्माण केलेला धार्मिक उन्माद भारतीय राष्ट्रवादाला व धर्मनिरपेक्षवादाला आव्हानात्मक ठरलेला आहे. संघ परिवारातील सर्व संघटनाची वैचारिक बैठक संघ पुरवितो. संघ हा संघ परिवाराच्या केंद्रस्थानी असून संघाचे निर्णय संघ परिवारातील सर्व संघटनावर बंधनकारक आहेत, असे म्हटल्यास अतिशयोक्ती नाही.

संघाचा सांस्कृतिकवाद अलिकडील काळांत उग्र स्वरूप धारण करीत आहे. संघाच्या छुप्या कारवाया आणि छुपे राजकारण आज गुपीत म्हणून राहिलेले नाही. ते आज जगजाहीर झालेले आहे. रँड कार्पोरेशन या अमेरिकन विचारवंत समुहाने रा. स्व. संघाला एक अतिरेकी हिंदू राष्ट्रीय चळवळ असे लेबल लावले आहे. इतकेच नव्हे तर पृथकता आणि विव्देष याच्यावर आधारलेली ती शक्तीशाली आणि लढावु धार्मिक चळवळ असेही म्हटले आहे. मुसलमान आणि खिश्चनाच्या वाढत्या अत्याचाराबद्यल त्याला दोषीही धरले आहे, आणि हिंदूस्थानच्या निधार्मिक राष्ट्र या संकल्पनेला संघ हा धोका आहे. असा आरोप केला आहे.

३२. (साधना, १५ सप्टेंबर २००५ / पृ. ९).

संघाची सांस्कृतिक आक्रमकता बाबरी मशीदीच्या अनुषंगाने उघड झाली. दि. ०६ डिसेंबर १९९२ ची बाबरीची घटना ही एक प्रलयंकारी घटना. भारतातील सर्वच हिंदूत्ववादी संघटनाकडून या दिवशी बाबरी मशिदीचा ढाचा उध्वस्त केला गेला. हिंदूत्ववादी नेत्यानी विचारपुर्वक ही घटना घडविली. भारतीय राजकारणांत हिंदू राष्ट्रवादाची एक दिर्घ परंपरा आहे. वैचारिक पातळीवर हिंदू राष्ट्रवादाची मांडणी येथील राजकारण्यांनी व हिंदू नेत्यानी वेळोवेळी केलेली आहे. परंतु बाबरी उध्वस्त करताना हिंदूत्ववाद्याचे हे आधुनिक आक्रमक रूप हे पुर्णतः भारतीय संस्कृतीसी विसंगत आहे.

नाझी तत्वज्ञानाविषयी प्रेम असणा-या संघ परिवाराने गुजरातमध्ये सहांरसत्र आरंभले त्या वेळी आंतरराष्ट्रीय मानवाधिकार संघटनेव्यतिरीक्त पाश्चात्य देशातल्या अनेक संघटना २००२ मध्ये माहिती गोळा करण्यासाठी गुजरातमध्ये गेल्या. भा. ज. पा. चे सरकार केंद्रात उदयाला आल्यानंतर देशांत सर्वत्र खिश्चन विरूध्दच्या मोहिमेला जोर आला. ग्रॅहम स्टेन्स आणि त्यांच्या दोन मुलांना हिंदूत्वावर श्रध्दा असणा-या गुन्हेगारांनीच जीवंतपणे जाळून मारले, हे सर्व जगाने पाहिले आहे.

वैश्विक मानवतावादाचा सुविचार मांडणारा संघ आपल्याच देशातील भिन्न धर्मीयांशी कोणती भूमिका घेतो हे उघड झालेले आहे. संघाचा राष्ट्रवाद हा संघप्रणीत हिंदूत्ववादाची आणि हिंदू धर्मव्यवस्थेतील उच्च वर्णीय स्वहिताशी व जातीय अंहकारासी संबंधीत असून - स्वजन हित हेच संघाचे उदिष्ठ आहे. भारतीय राजकारणावर हिंदूत्ववादी विचारांचे वर्चस्व सतत राहिले पाहिजे व प्रत्यक्ष राजकारणांत न उतरता ते साध्य पाहिजे या विषयी डॉ. हेडगेवार आणि गोळवळकरांनी जे चिंतन करून रा. स्व. संघाला जी कार्यात्मक दिशा दिलेली आहे ती फार महत्वाची आहे. भारतीय राजकारणांत हिंदूत्ववादी विचाराची एक संघटना निर्माण करून ती प्रत्यक्ष राजकारणापासून अलिप्त परंतु ती राजकीय दबावगटाचे काम करणारी अशा स्वरूपात सतत संघटीत ठेवली पाहिजे हा त्यांच्या चिंतनाचा निष्कर्ष होय. म्हणूनच रा. स्व. संघ हवे त्या वेळी राजकीय स्वरूप धारण करते व प्रंसगी राजकारणापासून अलिप्त राहून सांस्कृतिक संघटनेचे स्वरूप स्विकारले.

संघ ही फॅसिस्ट संघटना आहे. संघाने युरोपातील फॅसिझम १९२८ - ४५ व नाझीझम १९३३-४५ मधुन स्फुर्ती घेतली. आक्रमक राष्ट्रवाद, व्यक्ती स्वातंत्र्य विरोध, लोकशाही व समाजवादास विरोध, प्रस्थापीत राजकीय पक्षावर टीका, एकाधिकारशाहीवर आधारलेल्या पक्षाची सत्तेतील मक्तेदारी, अलौकीक नेत्यावर विश्वास, पक्षाचे निमलष्करी स्वरूप, जनतेच्या चळवळी उभ्या करण्यासाठी खोटया प्रचाराचा अवलंब, दहशतवादी मार्गाचा अवलंब, हिंसेचे उदात्तीकरण, एखादया समाजाबद्यल शत्रुत्व, सत्ताधारी वर्गाचे हिताचे रक्षण, सर्वकष व सर्वस्पर्शी हुकूमशाही व गुप्त पोलीस यंत्रणा अशी फॅसिझमची वैशिष्ठे आहेत.

ताकदवान भांडवलदार वर्ग व सुसंघटीत असा कामगारवर्ग असेल, अशा देशांत सामाजिक व आर्थिक पेचप्रसंगामुळे अनिश्चितता आलेली असेल तर त्यास तोंड न देवू शकणारा मध्यमवर्ग असेल आणि लोकाचा राजकीय व्यवस्थेवरील विश्वास उडालेला असेल तर फॅसिझमचा उदय होण्याची शक्यता असते. आर्थिक पेचप्रसंगावर मात करण्यासाठी भाडंवलदार वर्ग फॅसिझमचा आश्रय घेतो आणि आपले वर्चस्व पुन्हा प्रस्थापीत करतो. भाडंवलशाहीतील पेचप्रसंगावर मात करण्यासाठी सर्वकष हुकूमशाहीची गरज अलिकडे भासत नाही. सामाजिक नियत्रंणाचे सुप्त मार्ग व इतर नवे नवे मार्ग सहज उपलब्ध होत असल्याने (उदा. जागतिकीकरण) सर्वकष हूकूमशाही टाळली जाते. साम्यवादाचा व

समाजवादाचा धोका टळलेला आहे. तसेच नव - उदार व संस्कृतीचा सर्व दूर प्रचार झाल्यामुळे सहमतीचे राजकारण व अर्थकारण सुरू झालेला आहे.

आर्थिक प्रश्नावर जन आंदोलन घडवून आणल्या ऐवजी भावनिक प्रश्नावरून जन आंदोलन घडवून आणणे व जनतेला रस्त्यावर आणणे सुरू झालेले आहे. .

भारतात नव - फॅसिझम, नव हिंदूत्ववाद व मुलतत्ववादाच्या रूपाने अवतरला आहे. त्यातील हिंदूत्ववाद जास्त प्रभावी व ताकदवान असल्याने व त्याने स्वतःचा एक परिवार निर्माण करून राजकीय पक्षाव्दारे पुढे जाण्याचा प्रयत्न करीत आहे.

भारताच्या अर्थकारणांत निर्माण झालेले अंर्तविरोध आणि मध्यमवर्गाचा झालेला उदय आणि त्याची हिसंक संस्कृती नव उदारमत प्रणालीचे वर्चस्व या कारणामुळे भारतीय अर्थकारण व समाजकारण पुर्णतः ढवळून निघाले असून त्याचा प्रभाव भारतीय राजकारणावर झालेला दिसून येतो. धर्माच्या आधारे राजकारणांची मांडणी आणि धर्म विरहीत निधर्मी राजकारणाची मांडणी अशा एक वेगळा राजकारणाचा संघर्षीत ढाचा भारतीय राजकारणांत निर्माण झालेला आहे. विवेकनिष्ठ निधर्मी राजकारणाच्या आधारे समताधिष्ठीत सिध्दांतावर आधारीत समाज निर्माण झाल्याशिवाय समाज मनात राष्ट्रवाद निर्माण होवू शकत नाही. राष्ट्रप्रेम निर्माण होण्यासाठी समाजाविषयी प्रेम निर्माण व्हावे लागते. एकसंघ समाज निर्माण होण्यासाठी सामाजिक घटकामध्ये परस्पर संवाद, विश्वास, सर्व प्रकारची देवाण - घेवाण होणे अनिवार्य असते. संघाला हे मान्य आहे काय? हिंदू राष्ट्राचा विचार मांडणा-याना आर्थिक आणि सामाजिक समता मान्य आहे काय? स्वातंञ्योत्र काळांत आर्थिकदृष्टया पिळल्या गेलेल्या मजुरांच्या व कष्टकरी वर्गाच्या बाजूने त्यांनी आंदोलने उभी केली काय? अस्पृश्य व दारिद्रय रेषेखाली जीवन जगणा-यासाठी हिंदूत्ववाद्याचा कोणता भरीव कार्यक्रम आहे काय? या सर्व प्रश्नांची उत्तरे नकारात्मक असून - राष्ट्रासाठी इतरांनी, सर्वानी सर्वस्वाचा त्याग करावा ही भाषा वापरणारे हिंदूत्ववादी राष्ट्र व संस्कृती कोणत्या आशयाने व किती व्याप्तीने वापरतात. हिंदूत्ववाद्याची संस्कृती व राष्ट्र हे विशिष्ठ वर्गापुरतेच सिमीत असून त्यांत सामान्य माणसाचा समावेश नाही, हे खेदांत सांगावे लागते.

संघ परिवारातील इतर संघटना आणि त्यांची कार्यपध्दती संघाच्या मुळ विचारासी सुसंगत असून स्वतःचे किंबहूना संघ उद्दिष्ठांचे स्वरूप त्यांच्या कार्यातून जाणवते.

विश्वहिंदू परिषद, भारतीय मजदूर संघ, अ. भा. वि. परिषद, स्वदेशी जागरण मंच, बजरंग दल व इतर संघटना या संघाच्या मुळ उद्दिष्ठासी संलग्न आहेत.

## निष्कर्ष आणि समारोप

हिंदू संस्कृती सनातन असून जगातील ती सर्वश्रेष्ठ संस्कृती आहे, असा प्रचार करतात. वस्तुतः हा विचार बळावल्याने हिंदू संस्कृतीत गतीशुन्यतेचा दोष निर्माण झाला. त्याचाच परिणाम या संस्कृतीबद्दल अनेक भ्रम निर्माण झाले. वस्तुतः प्रत्येक मानव समूहाने संस्कृतीला जन्म दिलेला आहे. तीचा अधार समाज वास्तव आहे. भारतात संस्कृतीची निर्मीती हीच मुळी गण समाजाच्या विध्वसांतून झाली. मानवी समाजाची विभागणी जेव्हा श्रमविभागणीनुसार होत गेली, त्या क्रमाने संस्कृती युगाची सुरवात झाली. पशुपालन अवस्था, पशुपालन अवस्थेतील सातत्याने स्थलांतर करण्यात व स्थलांतरीत होणारा समाज, पशुपालनावरचा मालकी हक्क, त्या मधुन विकसीत झालेली खाजगी मालकी हक्काची कल्पना - कृषी अवस्था, कृषी अवस्थेतील माणसाला लाभलेले स्थीर जीवन, त्या व्यवस्थेत विकसीत गुलामगीरी पध्दती, त्या नंतरची जमीनदारी पध्दती ही वस्तुतः मानवी विकासक्रम आणि त्या विकासक्रमासी सलंग्न असणारी मानवी संस्कृती, या क्रमाने घडत गेलेल्या प्रक्रिया आहेत. ज्या भारतीय हिंदू संस्कृतीचा विचार एक सनातन संस्कृती म्हणून हिंदूत्ववादी मांडतात तीच्या निर्मीतीची आणि विकासाची बीजे ही मानवाच्या आदिम समाज जीवनाशी निगडीत आहेत. परंतु हिंदूत्ववादी हे मान्य करण्यास तयार नाहीत. वस्तुतः धर्माचा उदय संस्कृतीच्या उदयानंतर झालेला आहे. ज्या हिंदू धर्माचा आणि संस्कृतीचा विचार हिंदूत्ववादी माडंतात तो फारच मर्यादित अर्थाने आणि दृष्टीने. आजच्या हिंदूत्ववाद्याना अभिप्रेत असलेली संस्कृती आणि हिंदू धर्म हा वस्तुतः ब्राम्हाण्यवादी आणि ब्राम्हणी परंपरा सांभाळणा-या आहेत हे वास्तव कोणीही नाकारू शकत नाही. हिंदू धर्म आणि त्या अनुषंगाने अस्तित्वात असलेली संस्कृती ही विशेषतः दुस-या शतकानंतर ब्राम्हणी वर्णवर्चस्वाला पुरकच होती. बुध्दाच्या महापरिनिर्वाणानंतर या देशात बौध्द धर्माचा प्रसार झाला. बौध्द तत्वज्ञानांत अंतर्भूत असलेले तत्वज्ञान माणसाला माणुसपण बहाल करणारे, समतेचा, दया, करूणा, शांती, बंधुत्व, स्वातंञ्य या शाश्वत मुल्याची मांडणी करणारे असल्याकारणाने बौध्द धर्म भारताच्या सिमा ओलांडून चीन, जपान पर्यंत पोहचला. बौध्द धर्माचा आणि वर्ण व्यवस्थेचे समर्थन करण्यात हिंदू धर्म यांच्यातील संघर्ष हे ऐतिहासिक सत्य आहे. बौध्द धर्मीयांच्या प्रचंड कत्तली इस्लामीक राज्यकर्त्याकडून घडवून आणण्यात वैदिकांनी कसलिही खंत बाळगळी नाही. शंकराचार्यांचा उदय ही केवळ आकस्मिक

घटना नव्हे हिंदु धर्माचे पुर्नजीवन याचाच अर्थ सनातनी ब्राम्हण श्रेष्ठत्वाचा वर्ण व्यवस्थेचा नव्याने उदय असेच खेदाने म्हणावे लागेल, म. बसवेश्वर, चक्रधर स्वामी, भागवत संप्रदायातील संत निवृत्तीनाथ, संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत एकनाथ, चोखामेळा, जनाबाई, कान्होपात्रा , मुक्ताबाई ही सर्व भक्त मंडळी केवळ विठठलाचे उपासक नव्हते तर त्या काळातील ते श्रेष्ठ प्रबोधनकार, समाजसुधारक, वैचारिक क्रांती घडवणारे लोकनेते होते. तत्कालिन प्रस्थापीत समाजातील वर्णवर्गभेद, जातिभेद, उच्चनीचता या दोषाविरुध्द क्रांतीकारी विचार मांडणारी, प्रत्यक्ष आचरणात आणणारी ही संत मंडळी ही समाजक्रांतीकारक होती हा सर्व आढावा लक्षात घेतल्यास हिंदू धर्मातील बहुआयामिकता, व्याप्ती आपल्या लक्षात येईल. या अनुषंगाने पहिल्या प्रकरणात हिंदू धर्माचे विशुध्द स्वरूप मांडण्यात आलेले आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

## संदर्भ ग्रंथ


१ क्रांतीवीर बाबाराव सावरकर — द. न. गोखले, श्री. विद्या प्रकाशन,१९७९.

२ श्री गुरूजी समग्र दर्शन

३ श्री. गुरूजी — भारतीय विचार साधना, १९८५.

४ भारत — आचार्य जावडेकर.

५ मूसलमान शोध आणि बोध.

६ Pakistan or the partation of India — (Thakur & Company Bombay-१९४६)

७ B. R. Ambedkar — Pakistan or the partation of India. (Thakur & Company Bombay-१९४६)

८ B. R. Ambedkar — Pakistan or the partation of India. (Thakur & Company)

९ B. R. Ambedkar — Pakistan or the partation of India. (Thakur & Company Bombay-१९४६)

१० B. R. Ambedkar — Pakistan or the partation of India. (Thakur & Company Bombay-१९४६)